# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ६ ऑक्टोबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ६४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 6 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-64 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


महत्त्वाची बातमी

## धनगर आरक्षणविरोध राष्ट्रपतींच्या दारी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली:** धनगरांना आदिवासी कोटयातून आरक्षण देण्यास राज्यातील आदिवासी आमदारांनी विरोध केला असून हा वाद आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यापर्यंत पोहोचला आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष व आदिवासी नेते नरहरी झिरवळ यांच्या नेतृत्वाखाली १२ आदिवासी आमदारांनी बुधवारी मुर्मू यांची भेट घेतली. यासंदर्भात तथ्यांचा अभ्यास करून केंद्र व राज्य सरकारला सूचना करण्याचे आश्वासन मुर्मू यांनी दिल्याची माहिती झिरवळ यांनी दिली. धनगरांना आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही. त्यांना भटक्या विमुक्त प्रवर्गामधून ३.५ टक्के आरक्षणाचा लाभ मिळतो. या आरक्षणात वाढ केली तरी चालेल. धनगरांना आदिवासी कोटयातून नव्हे तर स्वतंत्र आरक्षण द्या. आदिवासींमध्ये धनगरांचा समावेश केला जाऊ नये, आमचे आरक्षण अबाधित राहिले पाहिजे, अशी मागणी मुर्मू यांच्याकडे केल्याचे झिरवळ यांनी सांगितले. राज्यामध्ये मराठा व ओबीसी आरक्षणाप्रमाणे धनगरांच्या आरक्षणाचा प्रश्नही तीव्र झाला आहे. धनगरांचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश करून त्यांना आदिवासी कोटयातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी गेल्या महिन्यामध्ये यशवंत सेनेने २१ दिवस उपोषण केले होते. या उपोषणानंतर राज्य सरकारने धनगरांच्या आरक्षणासंदर्भात बैठकही घेतली होती व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते.

# ईडीच्या भीतीने अजित पवार भाजपसोबत

## शरद पवार : चिन्ह गेले तरी लोक बदलत नाहीत

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या गटाची दिल्लीत गुरुवारी महत्त्वाची कार्यकारिणी बैठक पार पडली. या बैठकीत शरद पवार यांनी भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटावर निशाणा साधला. अजित पवार गट हा ईडीच्या कारवाईच्या भीतीमुळे भाजपसोबत गेला, असे शरद पवार यावेळी म्हणाले. अजित पवार यांच्या गटाच्या मंत्र्यांनी आणि आमदारांनी सत्तेत सहभागी झाल्यानंतर शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यांनी शरद पवार यांना सत्तेत सहभागी होण्याची विनंती केली होती. त्यांच्या या भेटीबाबत शरद पवार यांनी मोठा गौप्यस्फोट केला. यावेळी त्यांनी अजित पवार गटावर सडकून टीकाही केली.**



अजित पवार गटाची अध्यक्ष पदाची निवड चुकीची आहे. निवडणुकीची पद्धत कशी असावी हे मी त्यांना सांगितले. जे आज म्हणतात की ही निवडणूक योग्य नव्हती. मात्र यावर त्यांच्या सह्या आहेत. आम्ही एकत्र बसलो, चर्चा केली. जे लोक गेलेत ते म्हणतात की पक्ष आम्हाला मिळेल, चिन्हा मिळेल. जे अजून व्हायचे आहे ते कसे सांगतात की हा निर्णय आमच्या बाजूने लागेल? मला कळत नाही हे असे कसे असू शकते?, असे प्रश्न शरद पवारांनी उपस्थित केले.

जे लोक सोडून गेलेत त्यांच्या बोलण्याला काय आधार आहे? चिंता करण्याची गरज नाही. यापूर्वी काँग्रेसचीदेखील चिन्ह बदलली होती. काँग्रेसचे दोन भाग झाले होते. काँग्रेस आय आणि काँग्रेस ओ. निवडणूक चिन्ह हा महत्त्वाचा आधार आहे. चिन्ह गेले तरी लोक बदलत नाहीत. मी पहिली निवडणूक लढलो. मी उमेदवार होतो. चिन्ह बैलजोडी होते. त्यावर मी लढलो, निवडून आलो, असे शरद पवार म्हणाले.

तीन वर्ष संघर्ष झाला. निवडणूक आयोगाने चिन्ह चरखा दिले. तरीही मी जिंकलो. आणीबाणी आली. इंदिरा गांधींच्या विरोधात वातावरण होते. त्या निवडणुकीत हरल्या. त्यानंतर परत चिन्ह बदलले. गाय वासरू आले. चौथे हात, पाचवे चिन्ह घड्याळ आले. चिन्ह बदलण्याचा प्रयत्न होवू शकतो. मात्र चिंता करण्याची गरज नाही, असे शरद पवार म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी रेल्वे उद्घाटन करायला जातात आणि त्यांची रेल्वे ही विरोधी पक्षावर सुरु होते. भोपाळला गेल्यावर भाषण दिलं की राष्ट्रवादी पार्टी भ्रष्ट आहे. जर पार्टी भ्रष्ट आहे तर चौकशी करा आणि जर खरे असेल तर कारवाई करा. मात्र ज्यांच्याविरोधात आरोप केला ते आज राज्य मंत्रिमंडळात आहेत, असे शरद पवार म्हणाले.

8 लोकांना मंत्रिमंडळात सहभागी केले. हे लोक मला भेटयाला आले होते. आमच्या विरोधात ईडीची कारवाई होतेय. यातून काही मार्ग काढा. तुम्ही आला नाहीत तर ईडी येईल, अशी विनंती केली, असा गौप्यस्फोट शरद पवारांनी यावेळी केला. काही इमानदार कार्यकर्ते होते. त्यापैकी एक अनिल देशमुख. त्यांनी पक्ष सोडला नाही, असेही शरद पवार यावेळी म्हणाले.

# मनुष्यबळाची कमतरता खपवून घेतली जाणार नाही

## नांदेड घाटी रूग्णालयातील मृत्यूप्रकरणी चौकशी समिती

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये, महापालिका व नगरपालिकांची रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करावी आणि सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. नवी दिल्लीतून मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे शासकीय रुग्णालयांना भेटी देण्याच्या स्पष्ट सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. नवी दिल्ली येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतलेल्या या बैठकीला मुख्य सचिव मनोज सौनिक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांचेसह आरोग्य, वैद्यकीय शिक्षण विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते. नांदेड आणि घाटी येथील रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली आहे. दोषींवर कडक कारवाई केली जाईल. एकूण औषध असून जिल्हाधिकाऱ्यांनाही अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, रुग्णालयांचे अधिष्ठाता आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी एक टीम म्हणून आरोग्ययंत्रणेचे काम करावे. आवश्यक निधी आणि अतिरिक्त साधनसामुग्रीची मागणी आल्यास ती तात्काळ पुरविण्यात यावी. मनुष्यबळ कमी असल्यास आउटसोर्सिंग करण्याचे अधिकारही जिल्हास्तरावर देण्यात आलेले आहेत. त्यामुळे राज्यातील जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना साधनसामुग्री, मनुष्यबळाअभावी विलंब झाल्यास संबंधितांना जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल आणि औषधे, मनुष्यबळाची कमतरता ही कारणे खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारही मुख्यमंत्र्यांनी दिला.



पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 'टायगर इज बॅक', आजचे पालकमंत्री, उद्याचे मुख्यमंत्री असे बॅनर झळकले आहेत. हे बॅनर पुणेकरांची लक्ष वेधून घेत असून सोशल मीडियावरही चर्चा होत आहे.

# मर्जीतले व्यापारी मालामाल तर शेतकरी कंगाल

## वीस वर्षांपासून लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीची गतच न्यारी


आधुनिक केसरी न्यूज

मोहन पवार

लोहा : कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक म्हणले की आजकाल अनेकांच्या भुवया उंचावतात. लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आता काय शिल्लक राहिले? शेतकऱ्यांना इथे कुठे न्याय मिळतो, व्यापारी भाजून खात आहेत. ही बाजार समिती म्हणजे व्यापारी धार्जीनी. शेतकऱ्यांना न्याय मिळायचा तो काळच न्यारा होता. स्व. शंकराव कहाळेकर, कै. विठ्ठलराव पवार, कै. व्यंकटराव मुकदम, कै.बाबासाहेब लुंगारे ही माणसं म्हणजे शेतकरी धार्जिने होते. आता मात्र पैशाच्या पुरामुळे गेल्या वीस वर्षापासून लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीची गतच न्यारी झाली आहे. गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी, असे अजूनही सर्वसामान्य शेतकरी बोलून दाखवत आहेत.

लोहा कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणजे चौरसत्यावरील मुख्य बाजारपेठ तर तालुक्यातील उप बाजारपेठ, यात कापशी, सोनखेड, माळाकोळी, उमरा, मारतळा अन्य असून लोह्यासह येथील भूखंड आज घडीला कोट्यावधी रुपयाची मालमत्ता आहे. तरीही बाजार समिती झिरो बजेटवर आणले असल्याचे बोलल्या जात आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारी वेळेवर नाहीत, असलेले कायम कर्मचारी यांच्यावर प्रचंड प्रमाणात दबाव, बाकी रोजंदारी कर्मचारी हे केवळ मर्जीतले असून सुद्धा नांगी टाकत आहेत. यातून प्रचंड प्रमाणात माया जमा करण्याचे काम पदाधिकाऱ्यांनी व सर्वेसर्वा मानणाऱ्यांनी केल्यामुळे बाजार समितीचा कायापालट होणे दूरच.

आता दिवाळीपूर्वीच समोर आहे दसरा मागचे सगळं विसरा असे म्हणत मतदारांचे हात ओले केल्याशिवाय मतदान मागायला जायची हिम्मत होत नाही. नुसताच भपकेबाज सभेचा फोटो व्हायरल केल्यामुळे




निवडणूक जिंकता येत नाही. ग्रामीण भागातील तळागाळातील शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या लहानसहान व्यापाऱ्यांच्या नित्याच्या समस्या ऐकून घेतल्याशिवाय, समस्येचे निराकरण केल्याशिवाय सुज्ञ मतदार यांना सतपात्री दिले जाणारे दान देत नाही. परंतु लहान सहान पुढारी मोठ्या धेंडांपुढे मान वर करत नाहीत. याचाच प्रत्यय आज लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रणधुमाळीत दिसून येत आहे.

केवळ विरोधासाठी विरोध नको, पैशातून सत्ता व सत्तेतून पैसा याला कुठेतरी आळा बसायला पाहिजे. बाजारात आलेल्या सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, हमाल यांना पिण्याच्या पाण्याची सोय झाली पाहिजे. कितीतरी वर्षापासून पाण्याची टाकी ओस पडली. हमाल भवन धुळखात पडले, शेतकरी भवनाची त्यापेक्षा दुर्दैव म्हणजे व्यापाऱ्यांची चाललेली मनमानी, अव्वाच्या सव्वा भाव देत खरेदी करून स्वतःची ढेरगे भरण्यासाठीच आहेत का व्यापारी प्रतिनिधी? सर्व सामान्य शेतकऱ्यांचे आज कंबरडे मोडले आहे. वजन काटा हा गेल्या आठ दहा वर्षांपासून बंद असून केवळ मर्जीतल्या,जवळच्या व्यक्तीचा फायदा व्हावा म्हणूनच की काय ? कुठे पूर्वीचा काळ आणि कुठे आताचा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचा काळ ? कुठे नेऊन ठेवल्या लोहावासियांच्या अशा अपेक्षा ? यातून नेमका काय बोध घ्यावा ? अशी एक ना अनेक प्रश्नांची उकल शहर व तालुक्यातील सुज्ञ जागरूक लोक करत आहेत.

लोहा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये तत्कालीन आमदार चिखलीकर यांच्या कार्यकाळामध्ये सचिव म्हणून चार अक्षरी आडनावाच्या व्यक्तींची निवड करण्यात आली . या सचिवाने प्रचंड माया गोळा केली असून कंधारमध्ये आलिशान बंगला आला कुठून? याशिवाय अन्य प्रॉपर्टी याची चौकशी होणे गरजेचे आहे, असे मत लोहावाशीयामध्ये चर्चिले जात आहे . केवळ बी ए असून हा सचिव पदावर विराजमान झाल्यावर करोडो रुपयाची माया कुणाच्या आशीर्वादाने जमवतो, हा ही प्रश्न सर्वसामान्य लोहावाशीयांमध्ये उपस्थित होत आहे . या संदर्भात अनेकांनी वरिष्ठाकडे तक्रार करूनही राजकीय आश्रयामुळे सदरील सचिवाची चौकशी गुलदस्त्यात आहे .

हमाल भवन धुळखात पडले असून कुत्री ,मांजरे, डुकरे, गाढवे घेत आहेत विसावा . बाजारातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठीची टाकी व त्याला असलेले नळ व्यवस्थित राहिले नसून यावर गवत उगवले आहे . वजन काटा गेल्या कित्येक वर्षापासून बंद असून बाकी मर्जीतल्या वजन काट्याच्या मालकांची चांदी होत आहे .मापात पाप होत असून व्यापारी शेतकऱ्यांना कच्च्या पावत्या देऊन भाजून खात असल्याच्याही मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटत आहेत .गाळे धारकांकडून नाम मात्र शुल्क घेऊन बाजार समितीची वाट लावल्याचे जनमानसात बोलल्या जात आहे .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# होय, मला शिक्षक व्हायचं

आधुनिक केसरी

, त्याचा पगार सुरु होईल का वगैरे प्रश्न असतातच. कोणत्याच गोष्टीची शाश्वती देता येत नाही. अर्थात मी हे जे सांगतो आहे, ते उघड सत्य आहे. या गोष्टी सगळ्यांना माहिती असतात पण सगळेच त्या दबक्या आवाजात बोलत असतात. नियुक्ती करणारे संस्थाचालक, त्या नेमणुकीला मान्यता देणारे अधिकारी, राजकारणी या सगळ्यांची एक साखळीच कार्यरत असते.

एवढे सगळे होऊनही एखादा युवक वा युवती शिक्षक झालाच, तर त्याला त्याच्या मनाने काम करण्याचे कितीसे स्वातंत्र्य उरते ? नेमून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे, अधिकाऱ्यांना सारखी ही ना ती ऑनलाईन माहिती पाठवत राहणे, शाळेतील विविध प्रकारची लेखी कामे करणे, दिनविशेष साजरे करणे, संस्थाचालकांची हाजी हाजी करणे या सगळ्यात तो बिचारा गुंतून पडतो. शिवाय निवडणुका, जनगणना किंवा अशीच काही आणखी कामे यासाठी तो हक्काची व्यक्ती असतो. त्याची निम्मीअधिक शक्ती अशा गोष्टींमध्ये खर्च होते. या सगळ्या गोष्टीतून वेळ मिळेल तसे अध्यापन करणे, आपला अभ्यासक्रम पूर्ण करणे अशी कसरत त्याला करावी लागते. संस्थाचालकांची सभा असो वा शाळेत एखादा प्रमुख मोठा पाहुणा आलेला असो, शाळेच्या मुख्याध्यापक आणि इतर शिक्षकांना अतिशय सन्मानाने वागणूक दिली आहे, असे क्वचितच आढळते. बऱ्याच ठिकाणी अशा प्रसंगी त्यांना एखाद्या सेवकाप्रमाणे राबावे लागते. त्या शाळेमध्ये शिकणारे हजारो चिमणे डोळे ज्यांच्याकडे आपले आदर्श म्हणून लागलेले असतात, त्यांची अशी परिस्थिती पाहून वाईट वाटल्याशिवाय राहत नाही. शिक्षक दिनाचा एखादा अपवादात्मक कार्यक्रम सोडला तर शिक्षकांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवावे असे क्वचितच कुणाला वाटत असेल. साहित्य संमेलन असो, एखाद्या उपक्रमाचे उदघाटन असो वा अन्य काही प्रसंग. एखाद्या शिक्षकाला त्या प्रसंगी प्रमुख पाहुणा म्हणून बोलावले आहे असे फारसे आढळत नाही. वर्षानुवर्षे ज्यांनी प्रामाणिकपणे आणि अतिशय तळमळीने आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले आहे, अशा गुरुवर्यांना व्यासपीठावरील समोरच्या रांगेत कुठेतरी कोपऱ्यात बसवले जाते. नव्हे तेच संकोचून आपले स्थान मागेच आहे हे समजून स्वतःच त्या ठिकाणी बसतात. ज्यांची त्यांच्या पायाशी बसण्याची लायकी असते, ते सन्मानाने व्यासपीठावर विराजमान होतात. अर्थात सगळेच संस्थाचालक, राजकारणी वा अधिकारी असे असतात असे नाही.





# आनंदी पहाट

## स्वावलंबित्व अर्थव्यवस्थेवर अवलंबून

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ख्रिस्त पूर्व काळानंतर विकसित झालेल्या सिंधू खोऱ्यातील सभ्यतेमध्ये प्रगत आणि भरभराटीची आर्थिक व्यवस्था होती. सिंधू खोऱ्यातील लोक शेती, पाळीव प्राणी, तांबे, कांस्य आणि कथील यापासून अवजारे आणि शस्त्रे बनवत तसेच मध्यपूर्वेतील काही देशांशी व्यापारही करत. वैदिक युगात शेती ही लोकांची मुख्य आर्थिक क्रिया होती, परंतु दुसऱ्या शहरीकरणामुळे उत्तर भारतात अनेक शहरी केंद्रे वाढली, त्यामुळे व्यापाराला मोठी चालना मिळाली. प्राचीन भारतीयांचे मध्य पूर्व, रोमन साम्राज्य आणि दक्षिण पूर्व आशियासारख्या दूरच्या देशांशी व्यापारी संपर्क होते. अनेक भारतीय व्यापारी वसाहती इतर देशांमध्ये स्थायिक झाल्या. बहुतेक भारतीय लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते आणि खेड्यातील अर्थव्यवस्था स्वावलंबी होती. शेती हा लोकसंख्येचा प्रमुख व्यवसाय होता आणि गावाच्या अन्नाची गरज भागवत असे. तसेच कापड, अन्न प्रक्रिया आणि हस्तकला यासारख्या उद्योगांसाठी कच्चा माल उपलब्ध करून दिला जात असे. शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर वर्गातील लोक न्हावी, सुतार, डॉक्टर, सोनार, विणकर इत्यादी देखील व्यवसाय करत असत. शहरे आणि शहरी केंद्रांमध्ये नाण्यांद्वारे व्यापार होत असे, परंतु खेड्यांमध्ये वस्तुविनिमय ही आर्थिक क्रियाकलापांची मुख्य व्यवस्था होती. जाती आणि पोटजातींच्या व्यवस्थेने कामगारांचे विभाजन सुनिश्चित केले आणि शिक्षकांना प्रशिक्षण प्रदान करून संघाप्रमाणे कार्य केले. जातिव्यवस्थेने लोकांना व्यवसाय बदलण्यापासून आणि उच्च जातीच्या जीवनशैलीची आकांक्षा बाळगण्यापासून प्रतिबंधित केले. पारंपारिकपणे, संयुक्त कुटुंब पद्धती होती आणि कुटुंबातील सदस्यांनी व्यवसाय उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी त्यांची संसाधने एकत्र केली.



आधुनिक केसरी

## विधीचे विधान | ज्ञाना-तुका ||

नाद ब्रह्म नाम | अन्य नाही कोठे ||
अंतरी हा भेटे | ॐकारात ||१||
नाभी स्थानी वसे | ब्रह्मरूप त्याचे ||
परावाणी वाचे | प्रगटतो ||२||
निर्गुणाचे रूप | सगुण सांगते ||
संतवाणी गाते | अभंगात ||३||
पूर्व संचिताने | लाभतो हा छंद ||
दिंडीचा आनंद | तेचि ब्रह्म ||४||
नामावीन दुजे | नाही रे साधन ||
विधीचे विधान | ज्ञाना-तुका ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

पुष्पधरां गदाहस्तां श्रीगङ्गाधरवल्लभाम्|
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
१०४|| पुष्प धारण करणाऱ्या, हाती गदा धारण करणाऱ्या, श्रीगंगाधरवल्लभेला, दुर्गा देवीला अभीष्ट फल प्राप्त व्हावे, यासाठी मी नमस्कार करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ज्ञान एक रस रहत है, निर्मल शुद्ध स्वरुप ।
सहज मुक्त अत्त्रिय गजैं, शक्ति अखण्ड
अनूप ।।६९।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम
अध्याय) ०५/१०/६९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सद्गुरूंमधे ज्ञान एकरस असते. म्हणून ते नित्य, सहज शुद्ध, बुद्ध आणि मुक्त आहेत. ते सदैव ज्ञानमय, पवित्र, शुद्ध स्वरूपात राहून पृथ्वी, आत्म-मंडल आणि अंतरीक्ष या तीनही भूमींमधे भ्रमण करून आपल्या अद्भुत आणि अखंड शक्तीने सदैव प्रकाशमान राहातात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शुन्यत्वनिरसन


आधुनिक केसरी



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

एक म्हणतो वासना चांगली ठेवावी,वासना शुध्द असेल तर मनुष्य संसार रूपी भवसागर विनासायास पार पाडतो. एक म्हणतो संसार करून जाण्यासाठी निष्ठा पाहिजे. निष्ठेने भगवंताची प्राप्ती होते बाकी सगळे निष्फळ असते. एक म्हणतो आईबापांची सेवा करावी शुध्द भाव मनात आणुन त्यांची सेवा करावी. बाकीचे देवदेव करत हिंडायचे आणि घरी आईवडिलांना दूर लोकांचे यांनी देव भेटतो नाही. तर वृध्द लोकांसाठी असलेले कर्म निष्काम बुद्धीने करावे. एक म्हणतो देवाब्राम्हणाचे पूजन करावे.शास्त्राचा अभ्यास करावा. आपल्याला भगवंताने जो उपदेश केला आहे त्याप्रमाणे वागावे.म्हणजे मोक्ष मिळतो. एक जण म्हणतो की शास्त्र येवढं मोठं आहे की आपलं सगळं आयुष्य त्यात खर्च केला तरी ते संपणार नाही म्हणून त्यांच्या भानगडीत न पडता साधुसंतांना शरणं जावे. एक म्हणतो उगीच बाष्कळ बडबड करण्यात काही अर्थ नाही. तर निर्मळ मन असावे. अंतःकरतात भूतदया असावी.

# गहिनीनाथ




झोळी त्याच्याजवळ देऊन तो शौचास गेला. तेव्हा गोरक्षनाथाने गुरूच्या झोळीत पाहिले तो सोन्याची वीट दिसली. तेव्हा हेच भीतीचे मूळ असे जाणून त्याने ती वीट फेंकून देऊन तितक्याच वजनाचा एक दगड तीत भरून ठेविला व आपण चालू लागला. मच्छिंद्रनाथ ही मागून चालू लागला. गोरक्ष बराच लांब गेल्यावरही गुरू मागून येतच होता. त्याची वाट पहात तो विसावा घेत बसला. तितक्यात एक विहीर त्याचे नजरेस पडली. तीत त्याने स्नान केले, मीननाथास स्नान घातले व नित्यकर्म उरकून घेत आहे तो मच्छिंद्रनाथ जवळ आला आणि पूर्ववत् 'येथून पुढे काही भय वगैरे नाहीना ?' असे विचारू लागला. त्यावर 'भय होते ते मागे राहिले, आतां काळजी न वाहतां स्वस्थ असावे' असे गोरक्षनाथाने उत्तर दिले.अशा उडवाउडवीच्या गोष्टी जेव्हा गोरख सांगू लागला तेव्हा मच्छिंद्रनाथ चकित झाला.

# नामाचे त्रिकालबाधित श्रेष्ठत्व !

आधुनिक केसरी

नाम हे सच्चिदानंद स्वरूप आहे. शुद्ध परमात्मस्वरूपाच्या अगदी जवळ कुणी असेल तर ते फक्त नामच होय. नाम हे चिन्मय असल्यामुळे त्याचा आनंद ओसंडून येतो आणि ही सृष्टी तयार होते. अनेक रूपे घडविणे, ती मोडणे आणि नवीन तयार करणे, पण आपण स्वतः मात्र मूळ स्वरूपाने राहणे, ही केवढी विलक्षण लीला आहे ! खरोखर, तुम्हाला मी काय सांगू ! बोलायला शिकल्यापासून आजपर्यंत मी नामाबद्दलच बोलत आहे, अजून नामाचे माहात्म्य संपत नाही. नामाचे माहात्म्य सांगून संपले तर भगवंताचे भगवंतपण लटके झाले असे समजावे. जो नामात 'मी' पणाने नाहीसा झाला त्यालाच नामाच्या माहात्म्याची कल्पना आली. असा पुरूष नामाविषयीं मौन तरी धरील, कारण त्याचे माहात्म्य कोणालाच सांगता येणार नाही; किंवा शेवटच्या श्वासापर्यंत नामाचे माहात्म्यच सांगत राहील, कारण ते कितीही सांगितले तरी संपणार नाही, आणि कितीही ऐकले तरी तृप्ती होणार नाही. नामाने सर्व पापे नाहीशी होतात. भगवंताला



विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते.
नाम हे वेदांपेक्षाही श्रेष्ठ आहे, कसे ते पहा. वेदाध्ययनापासून फायदा होण्यासाठी चारी वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे. त्यासाठी पुष्कळ वेळ आणि श्रम लागतात. नामाला श्रम नाहीत. दुसरे, वेदांचा अधिकार सर्व लोकांना नाही, पण नाम कुणीही घ्यावे. वेदांच्या मंत्रांचा आरंभ ॐकारानेच होतो, म्हणून वेदारंभी देखील नामच आहे. नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगामध्ये बदल होण्यासाठी यात्रा करायची असते; पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती, वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. पंढरपूरला जाऊन नाम घेण्याचे जर न शिकला तर जाणे व्यर्थ गेले म्हणावे. नाम घ्यावे अशी बुद्धी होण्यासाठीच तिथे जाणे जरूर आहे. नाम हे सर्व सत्कर्मांचा राजा आहे. सत् म्हणजे भगवंत, त्याच्याकडे नेणारे जे कर्म तेच सत्कर्म. इतर कर्मे आडवळणाने भगवंताकडे नेतात, नाम हे साक्षात् भगवंताकडे पोहोचवते. नामाने भवरोग नाहीसा होतो. भव म्हणजे विषय. विषयांची आसक्ती असणे हा सर्व रोगांचा पाया आहे. नाम घेतल्याने भगवंताकडे प्रेम लागते आणि इतर ठिकाणची आसक्ती सुटते. नामाने सर्व दुःखे नाहीशी होतात, कारण या दुःखाचे मूळ विषयांच्या आसक्तीमध्ये आहे, आणि नामाने ती आपोआप सुटते, म्हणून दुःख नाहीसे होते. शिवाय, भगवंत हा आनंदरूप असल्याने त्याला नामाने घट्ट धरला की दुःख त्या ठिकाणी कसे राहू शकेल ?



इतिहासाचा डोळस अभ्यास आणि छत्रपती शिवराय पान ६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ६ ऑक्टोबर २०२३



टमाटे फेकून देणारा शेतकरी पाहिला अन्... पान ७


# वडिलांच्या कवितांना मुलांनी दिले मूर्त स्वरूप

## कवितांना संगीत देत 'शब्दलेणी शब्दगाणी'तून गीतांचे रसिकांपुढे गायन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कवितेचे गाणे होतांनाचा प्रवास करतांना युवा संगीतकार व गायक प्रथमेश महाजन, नंदिनी महाज या बहीण भावाने उपजत प्रतिभेला मोकळे करत संभाजीनगर शहरात 01 ऑक्टोबर रोजी भानुदासराव चव्हाण सभागृहात 'स्वरप्रथम'ची नवनिर्मिती असलेली 'शब्दलेणी शब्दगाणी' ही मैफल साजरी केली. वडिलांच्या कवितांना त्यांची मुले प्रथमेश, नंदिनी यांनी संगीतबद्ध करून रसिकांसमोर स्वतः सादर केली. दर्दी रसिकांनी तुडुंब भरलेल्या आणि त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने बहरलेल्या या अनोख्या मैफलीचे उदघाटन प्रसिध्द कवी प्रा.फ.मुं.शिंदे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. व्यासपीठावर बालसाहित्यिका लीलाताई शिंदे, लेखक प्रा. विजय पोहनेरकर, साहित्यिक श्रीकांत उमरीकर, उद्योजक स्वानंद पाटोदकर, अविनाश चौधरी, भगवान महाजन सुलभा महाजन यांची उपस्थिती होती. अतिथींचा सन्मानचिन्ह, शाल, मोत्याची माळ देऊन सन्मान करण्यात आला. प्रा. फ.मुं. शिंदे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत उद्घाटनपर मनोगत व्यक्त केले. 'संगत चांगली असली की संगीत चांगले निर्माण होते' असे असल्याचे सांगून संगीतकलेला वाहून घेतलेल्या बहीण-भावाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. प्रा विजय पोहनेरकर यांनीदेखील मनोगतातून नवनिर्माण करणाऱ्या बहीणभावाचे कौतुक केले. 'स्पर्शिका'कार सुहास महाजन यांच्या आरस्पानी शब्दांच्या कवितांना अवीट चाली लावत साजरी झालेली ही मैफल रसिकांना मंत्रमुग्ध करून गेली. कॅन्सरसारख्या दुर्धर आजारावर मात करून अनेक मॅरेथॉन जिंकनारा पराग लिगदे याचा सत्कार करून मैफलीची सुरुवात 'शब्दलेणी शब्दगाणी' या शीर्षक गीताने झाली. 'किती लाजण्याचा तुझा हा बहाणा, तुझा हा बहाणा किती लाजण्याचा...', 'तुला कसे बोलावे कळेचना, तुला कसे बघावे कळेचना...' या गीतांसह इतर गीतांनी रसिक तृप्त झाले. तत्पूर्वी प्रास्ताविकात कवी सुहास महाजन यांनी आपल्या कवितांना गाण्यात रूपांतरित करतांना 'शब्दलेणी शब्दगाणी'चा सौन्दर्यप्रवास उलगडून दाखवला. ही गाणी मराठी रसिकांपर्यत पोहोचावीत यासाठी 'स्वरप्रथम' या YOUTUBE CHANEL चे मान्यवरांच्या हस्ते लोंचिंग करण्यात आले. प्रा. मोहन बाभुळगावकर यांच्या निवेदनाने मैफल कलेकलेने सजत गेली. अलिकडल्या काळातील एक श्रवणीय मैफल अनुभवल्याची भावना रसिकांनी व्यक्त केली. 'उजळू दे वात दिवा सांजवेळ आली' या सुरेख गीताने मैफलीची सांगता झाली. जितेंद्र साळवी, गिरीश काळे, विनोद वाव्हळ, अमर वानखेडे, मयुर म्हस्के या वादकांनी गाण्यांना साथसंगत केली. कार्यक्रमासाठी उमेश जोशी, कृष्णा कुलकर्णी सुरपिंप्रीकर, श्रीपाद जोशी, विनय देशपांडे, जयंत येरमाळकर, शालिग्राम तुरे, उत्कर्षा हातोळकर, सार्थकी कुलकर्णी, दीप्ती जोशी, ऋषी कुलकर्णी, अमोघ केन्हाळकर, जितेंद्र उगले यांनी परिश्रम घेतले.




**संगीतामुळेच जीवनात आनंदाचे आविष्कार : प्रा .फ .मु .शिंदे**

प्रा . फ . मु . शिंदे आपल्या खुमासदार मनोगतात म्हणाले, जीवनात दोन गोष्टी आनंद देत असतात, एक संगत आणि दुसरे संगीत. माणूस आपल्या जीवनात कोणत्या न कोणत्या तरी सुराला बांधलेला असतो, यामुळेच त्याच्या जीवनात आनंदाचे आविष्कार घडत असतात . 'या जगाची त्या जगाला ओढ राहिली नाही, जिभेच्या द्वेषापोटी साखर गोड राहिली नाही', असे सांगत जीवनातला गोडवा कमी होता कामा नये, संगीताचेही हेच संस्कार असतात असे मत शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले .

# दोन दिवसांत मिळणार उर्वरित अनुदान

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** परतूर मंठा तालुक्यातील 15200 त्यावर उर्वरित



राहिलेल्या शेतकऱ्यांना अतिवृष्टी व अति पावसामुळे झालेल्या नुकसानीचे उर्वरित शेतकऱ्यांना अनुदान येत्या दोन दिवसात मिळणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

यासंदर्भात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आरडीसी केशव नेटके परतुर व मंठा तहसीलदार यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत रखडलेल्या अनुदानाचा प्रश्न येत्या दोन दिवसात मार्गी लावण्याची सूचना केली यामुळे रखडलेल्या उर्वरित अनुदानाचा प्रश्न मार्गी लागला असून शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच रक्कम जमा होणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

अनुदानाच्या रकमे पोटी अंदाजे नऊ कोटी अनुदान शेतकऱ्यांना मिळणार असून, परतूर तालुक्यातील उर्वरित 3200 शेतकरी तर मंठा तालुक्यातील 12000 शेतकऱ्यांना अनुदान प्राप्त होणार आहे.

गेल्या काही दिवसापासून आधार शेडिंग व तत्सम कारणामुळे हे अनुदान रखडले होते मात्र प्रशासनाने सतर्क होऊन शेतकऱ्यांसाठी पुढाकार घ्यावा याकरता लोणीकरांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना फैलावर घेत अनुदान त्वरित वितरित करण्यासंबंधी सूचना करत तांत्रिक बाबी तात्काळ पूर्ण करा असे सांगितले होते या पार्श्वभूमीवर परतुर व मंठा तालुक्यातील उर्वरित शेतकऱ्यांना अनुदान प्राप्त होणार असून ही बाप समाधानची असल्याचे आमदार लोणीकर यांनी पत्रकात नमूद केले आहे. पुढे या पत्रकात म्हटले आहे की, हे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे त्या मुळे येणाऱ्या दोन दिवसात उर्वरित सर्व शेतकऱ्यांना अनुदान मिळणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी शेवटी म्हटले आहे.



# घाटीच्या खासगीकरणाविरोधात निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** घाटीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खाजगीकरण करून गोरगरिबांच्या उपचारावर गदा आणु नका, दुकानदारी करु नका या मागणीसाठी महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संलग्न आयटकतर्फे आर एम ओ ऑफीस समोर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी घाटीचे खाजगीकरण करणारे व त्यांना पाठिंबा देणाऱ्यांचा निवडणुकीत पराभव करा, खाजगीकरण हाणून पाडा असे आवाहनही आयटकचे ॲड. अभय टाकसाळ यांनी केले. शिंदे,फडणवीस, अजीत पवार शरम करो, घाटी बेचना बंद करो, सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल चे खाजगीकरण हाणुन पाडा, घाटी गरीबाच्या हक्काची नाही कुणाची बापाची, इत्यादी घोषणांनी घाटी फरीसर दणाणुन गेला. यावेळी बी एस एन एल एम्लॉइज युनियनचे नेते कॉ रंजन दाणी, समाजवादी पार्टीचे फैसल खान, भिमशक्ती रोजंदारी कर्मचारी युनियनचे कीरणराज पंडीत यांनीही या आंदोलनाला पाठींबा दिला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय घाटी हॉस्पिटल औरंगाबाद येथे जवळपास 11 जिल्ह्यामधून हजारो ग्रामीण व शहरी गोरगरीब रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात सध्याच्या व्यवस्थेमध्ये मोफत व दर्जा उपचार देण्याऐवजी 150 कोटी रुपये जनतेचा पैसा खर्चून उभी राहिलेली सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलची इमारत मंत्र्यांच्या बगलबच्चन दुकानदारी करण्यासाठी खाजगीकरणाचा निर्णय शिंदे फडणवीस अजित पवार सरकारने घेतला आहे हा निर्णय रद्द झाला पाहिजे. खाजगीकरणाचा जनविरोधी निर्णय रद्द केला नाही तर हे सरकार येत्या निवडणुकीत रद्द करून टाकू, रुग्णांच्या नातेवाईकांनी कर्मचाऱ्यांनी जागरूक नागरिकांनी मोठ्या संख्येने आर एम ओ ऑफिस समोरील निदर्शनात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्नालय औरंगाबादचे अधिष्ठाता डॉ विजय राठोड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठवण्यात आले. नांदेडच्या डीन यांचा अपमान करणार्या शिंदे गटाच्या खासदाराचा राजीनामा घ्या, कथित कंत्राटी कामगारांना दरमहा 15000/- रुपये वेतन त्यांच्या खात्यात जमा करा, औषध, इंजेक्शन, एम आर आय सिटी स्कॅन मोफत द्या इत्यादी मागण्या करण्यात आल्या. यावेळी ॲड.अभय टाकसाळ, किरण पंडित, राजु हिरवळे , विकास गायकवाड, अनिता हिवराळे संघटक, जॅक्सन फर्नांडिस, माधुरी जमदाडे, यासह मोठ्या संख्येने रुग्नांचे नातेवाईक आणि घाटी शाखेतील सर्व सभासद उपस्थित होते.



# भारनियमन थांबा अन्यथा; टाळे ठोकणार

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** महावितरण कडून होणाऱ्या वीज वसुलीला चांगला प्रतिसाद देऊन शेती पंप ग्राहकांनी आपली बिले भरलेली आहेत . यावर्षी पाऊस अत्यंत कमी पडल्यामुळेपिकांना पाण्याची नितांत गरज वाढलेली आहे.वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्याचा हलगर्जीपणा, विद्युत पुरवठा अभावी पिकाचे नुकसान.घनसावंगी तालुक्यातील मंगरूळ शिवारातील 15दिवसापासून शेती पंपाची वीज गायब वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभार बाबत शेतकरी मध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे . संबंधित अधिकाऱ्यांना कंपनी कर्मचाऱ्यांना गावातील नागरिकांनी संपर्क केला असता उडवा उडवी चे उत्तर देतात. सामान्य जनतेने कधी पर्यंत हा त्रास सहन करायचा.वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे शेती पंप मोटार जळणे चे प्रकार वाढलेले आहे. डीपीवर चे सर्व मेंटेनन्स शेतकरी हा स्वतः करतो. जसेकी,डीपीचा बॉक्स जळाला, वायर जळले, ऑईल जळले, शेतकरी सो खर्चाने दुरुस्त करत असतात.तसेच जुलै ऑगस्ट सप्टेंबर या तीन महिन्यात पिकाला पोषक असा पाऊस पडलेला नाही अशा परिस्थितीमध्ये बंधाऱ्याला पाणी असूनही लाईट अभावी ऊस. कापूस, सोयाबीन, मका, बाजरी, या पिकाचे प्रचंड नुकसान झालेले आहे. या उद्धट वीज वितरण कंपनीला या संदर्भात जॉब विचारण्यात आला लवकरात लवकर या समस्येचे निराकरण करा अन्यथा जनसामान्याचा भावनांचा उद्रेक व्हायला वेळ लागणार नाही आणि जर ही परिस्थिती अशीच राहिली तर घनसांवगी तालुका काँग्रेस कमिटीवतीने व मंगरूळ चे सर्व शेतकरी निवेदन देऊन लाईट सुरळीत करण्याचे आश्वासन श्री श्री सूर्यवंशी उप अभियंता घनसांवगी यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले. तालुकाध्यक्ष रामप्रसाद खरात. सोशल मीडिया अध्यक्ष गणेश कुंडरे.. पृथ्वीराज खरात. विक्रम काका खरात, सचिन शिंदे, गणेश खरात. तफान खरात. भाऊसाहेब खरात अमोल शिंदे दीपक खरात आदित्य खरात, नामदेव बेवले, रामभाऊं सोनटक्के, खंडू जावळे विनोद खरात धनंजय खरात पवन खरात. राहुल खरात . रांखुंडे. काळे. उपस्थित होते.

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीवर गुराख्याचा बलात्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अभियांत्रिकी महाविद्यालयातून घराकडे जात असताना जामठ्याजवळील जंगलात एका गुराख्याने कुऱ्हाडीचा धाक दाखवून विद्यार्थिनीला अडविले. जंगलात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. ही घटना बुधवारी दुपारी घडली. हिंगणा पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरु आहे. पीडित २२ वर्षीय तरुणी मूळची यवतमाळची आहे. ती हिंगण्यातील एका अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. बुधवारी ती यवतमाळवरून बसने नागपुरात आली. महाविद्यालय काही अंतरावर असल्यामुळे पायी जात होती. तो भाग जंगलाचा आहे. काही वेळातच एक गुराखी कुऱ्हाड घेऊन पाठलाग करायला लागला. त्याने तरुणीला गाठले आणि कुऱ्हाडीचा धाक दाखवून तिला जंगलात नेले. तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी हिंगणा पोलिसांनी तरुणीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. गुराखी तरुण पाठलाग करीत असल्यामुळे घाबरलेल्या तरुणीने बहिणीला फोन केला. बहिणीशी बोलतानाच त्याने तिचा भ्रमणध्वनी हिसकला आणि फोडला.

# आदित्य ठाकरेंचा सवाल

आधुनिक केसरी

ठाकरे गटाचे युवानेता आदित्य ठाकरे यांनी काही वर्षांपूर्वी मुंबईतील वीरमाता जिजाबाई भोसले प्राणी संग्रहालयात पेंग्विन आणले होते. मुंबईच्या उष्ण वातावरणात पेंग्विन टीकू शकणार नाहीत, अशी टीका त्यावेळी करण्यात आली होती. तसंच, मुंबईसारख्या शहरांत अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प रखडले आहेत, अनेक पायाभूत सुविधांपासून मुंबईकर वंचित असताना पेंग्विनवर खर्च करण्याची गरज काय? असा सवाल विरोधकांकडून विचारला गेला होता. त्यावरून आदित्य ठाकरेंवर सातत्याने टीका केली जाते. यावर त्यांनी आज चोख प्रत्युत्तर दिले आहे. मुंबईतील इंडिया टुडे कॉनक्लेव्हमध्ये ते बोलत होते. आदित्य ठाकरेंना बेबी पेंग्विन संबोधून त्यांची खिल्ली उडवली जाते. याबाबत त्यांना आज विचारण्यात आले होते. त्यावर ते म्हणाले की, सहा वर्षांपूर्वी आम्ही मुंबईत पेग्विंन घेऊन आलो. कोणत्याही प्राण्याची जगभरातून आयात करायची असते तेव्हा मोठा पत्रव्यवहार वगैरे करावा लागतो. त्या कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच त्यांना भारतात आणले होते. आज पेंग्विनमुळे प्राणीसंग्रहालय नफ्यात आले आहे. दरदिवशी ३० हजार लोक प्राणीसंग्रहालयाला भेट देतात आणि पेंग्विन कसे आहेत हे पाहतात. आता पेंग्विनची स्थिती पाहा आणि चित्त्याची पाहा. आमच्या पेंग्विनने मुंबई पालिकेला ५० खोक्यांचं उत्पन्न मिळवून दिलं. पण जे पळून गेले ते स्वतःसाठी ५० खोके घेऊन पळाले. एवढंच नव्हे तर, मी पेंग्विनसारखे चालतो की सराकरमधील कोणी चालतं ते पाहा, असा मिश्किल टोलाही त्यांनी कोणाचंही नाव न घेता लगावला.
आदित्य ठाकरे लोकसभा निवडणूक लढवणार का? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. तेव्हा त्यांनी सुरुवातील मिश्किल उत्तर दिले. त्यावर त्यांना पुन्हा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर देण्याची विनंती मुलाखतकाराने केली. त्यावर आदित्य ठाकरे म्हणाले की, पक्ष मला जी जबाबदारी देईल ती निवडणूक मी लढवेन. मी प्रत्येक कार्यकर्त्याचा आदर करतो, त्यामुळे पक्ष जी जबाबदारी देईल ती मान्य असेल. बंडखोरीच्या महिनाभर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे आणि त्यांचा मुलगा श्रीकांत शिंदेला भेटायला बोलावले होते आणि त्यांना मुख्यमंत्री व्हायचे आहे का हे विचारले होते. नोव्हेंबरमध्ये माझ्या वडिलांची शस्त्रक्रिया झाली. तेव्हापासून विविध माध्यमातून ही माहिती समोर येत होती की ते पक्षात बंडखोरी करण्याच्या वाटेवर आहेत. तसेच, उद्धव ठाकरे आता रुग्णालयात आहेत, ते पक्ष चालवू शकतात का? असा प्रचारही त्यांनी केला.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# हे कोडं खा. संजय राऊतांना कसं कळणार ?

आधुनिक केसरी

**खा. संजय राऊतांची वैचारिक बुद्धी हीच खऱ्या अर्थाने आता नासक्या कांद्यासारखी झाली असुन सत्य परिस्थितीला असत्य म्हणत लेखणीच्या बळावर जनतेची दिशाभुल रोज करताना दिसतात. खरं तर अग्रलेख लिहिताना वस्तुस्थिती मांडली तर वाचकांचा विश्र्वास संपादकावर बसतो.पण केवळ लबाडीचं राजकारण करायचं. बिनबोभाट आरोप करायचे आणि मग स्वस्तुतीपाठक बनुन काहीतरी मांडायचं आणि मग लिखाणाचा सामना करायचा. ज्या भाजपला पब्लिक कंपनी नाही असं म्हणत हिणवणाऱ्या राऊतांच्या डोळ्यात दिवसा कुसळ गेल्यासारखं म्हणावे लागेल. कारण 105आमदार ज्या पक्षाचे आहेत जो पक्ष सर्वात मोठा राज्यात म्हणुन पुढे आला.**

अठरापगड जातीधर्माच्या लोकांनी केवळ राज्यात नव्हे तर देशात नेतृत्वाची संधी देताना चांदा ते बांदा लोकसभेच्या सर्वाधिक जागा निवडुन तुमच्या हाती भोपळा दिला. हे गमक लोकसहभागाचं जर तुम्हाला वाटत नसेल तर कुठपर्यंत तुम्ही लेखणीचा सामना करत जनतेला वेड्यात काढणार ?हा प्रश्न आता सर्वांनाच पडु शकतो. ज्या काँग्रेसनं देशाच्या राजकारणात केवळ घराणेशाही चालवताना हुकुमशाही पद्धतीने कारभार केला, ज्यांनी हिंदुत्व विचारसरणीची पाळंमुळं उखडुन काढण्याचं काम केलं, त्यांच्या रांगेत ठाकरे शिवसेनेला घेवुन जाण्यात तुम्ही पहिले वस्ताद. सबका साथ, सबका विकास हीच वैचारिक घंटा खऱ्या अर्थाने भाजपाच्या विचाराचा मुळ पाया असुन पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या कल्पनेतला अंत्योदय आणि डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नातला भारत उभा करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा रात्रंदिवस मेहनत करतात आणि अवघ्या नऊ वर्षात त्यांनी सिद्ध करून दाखवलं हे राऊतांनी लक्षात घेतलं तरी बरं.
खा. संजय राऊतांच्या बोलण्याला लगाम कुणीच लावु शकत नाही. कारण ज्यांचं मानसिक समतोल ढासळलेलं असतं तिथे वैद्यकिय उपचार देखील कमी पडतात. यांचं केवळ मानसिक संतुलन ढासळलं असं नव्हे तर वैचारिक बुद्धी देखील रसातळाला गेली असुन त्याचाच एक भाग म्हणुन मुखपत्राच्या संपादकिय अग्रलेखातून केवळ विरोधाला विरोध म्हणत ज्ञानाचे डोस पाजण्यासाठी लेखणीचे दिवे पाजळताना ते दिसतात. आज त्यांनी अग्रलेखातून भाजपाला लोकसहभागाचा पक्ष नाही असं म्हणणं म्हणजे रांगत्या लेकराच्या हातातला खुळखुळा वाजल्यासारखं होय. खरं तर समाजाच्या दृष्टीने पत्रकार आणि त्यातही संपादक बुद्धीजिवी म्हणुन ओळखल्या जातो. मात्र राजकिय वाटाने चालणारे संपादक केवळ आपल्या मालकाची मर्जी सांभाळण्यासाठी जेव्हा आकलेचे तारे तोडत सत्याची बाजु असत्य दाखवतात त्यावेळी मात्र संपादकाच्याही अग्रलेखाची किव् सामान्य वाचकाला आल्याशिवाय रहात नाही. भाजप हा लोकसहभागातला पक्ष नाही असा नवीन जावाईशोध राऊतांनी लावला. आम्ही कदाचित त्यांच्या एवढे ज्ञानी नसुत. पण पत्रकार म्हणुन आम्ही देखील पस्तीस वर्षापासुन या क्षेत्रात काम करतो. मागे वळुन पहाताना जो भाजपा तीन खासदारांचा पक्ष होता तो आजच्या युगात 2023 साली 303 अधिक 50एवढ्या बहुमताने देशात नेतृत्व करतो. लोकसभा असो किंवा राज्यसभा अवाजवी मताने ठराव संमत संसदेत होतात. काल परवा 33 टक्के महिला आरक्षणाचा ठराव केंद्र सरकारने मांडला. सहमतीने पास झाला. मग आता खऱ्या अर्थाने राऊतांनी सांगावं की भाजपा हा लोकसहभागाचा पक्ष आहे का नाही? बरं केंद्राचं सोडा, राज्यात 2019 ला विधानसभा निवडणुकीत 105 भाजपाचे आमदार निवडुन आले. सर्वाधिक आकडा मोठा आहे.
राष्ट्रवादी, काँग्रेस आणि सद्या शिल्लक असलेल्या ठाकरे शिवसेनेपैकी एकालाही साठीसुद्धा गाठता आली नाही. तरीसुद्धा राऊतांना लोकसहभागाचा भाजपा वाटत नसेल तर किती हा वेडा संपादक? आणि त्यांची मानसिकता अकलेचे तारे तोडताना दिसते हे नक्कीच. 105 विधानसभेची ताकद म्हणजेच राज्यातील 17 कोटीपैकी नाही म्हटलं तरी 53 टक्यापैकी अधिक साक्षात मतदार भाजपाच्या बाजुने उभा आहे. असं असताना संपादक राऊतांची बुद्धी भाजपाला पब्लिक पक्ष म्हणत नाही हे हास्यास्पद.ज्या काँग्रेसनं देश चालवताना सामान्य माणुस नजरेसमोर ठेवला नाही, पन्नास वर्षात काँग्रेसला कधी शेतकऱ्यांचं हित दिसलं नाही, पायाभुत सुविधेला अग्रक्रम दिला नाही, केवळ भ्रष्टाचार करणं आणि सत्ता चालवणं हे सुत्र ज्या काँग्रेस आणि आता



शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादीचं राहिलं एवढेच नाही तर ज्या काँग्रेसवर स्व.बाळासाहेब ठाकरेंनी भ्रष्टाचाराचे आसुड ओढले त्या काँग्रेसला हे राऊत उपक्रमाचा पाया रचला असं म्हणत असेल तर किती आता मताचं लांगुनचालन तुम्ही करता हा प्रश्न पडतो. सबका साथ, सबका विकास हे सुत्र आणि देशातील कष्टकरी, शेतकरी यांना नजर डोळ्यासमोर ठेवत केवळ जनहितासाठी 800 पैकी अधिक योजना केंद्र सरकारने राबवल्या. हे कार्य कौतुक कुसळ डोळ्यात गेलेल्या संपादकाला दिसणार कसं? हाच प्रश्न पडतो. मध्यंतरी बीआरएस अर्थात तेलंगणा नेतृत्व जेव्हा महाराष्ट्रात प्रवेश करताना दिसलं त्यावर याच राऊतांनी आक्षेप घेतले. नव्हे तर ही भाजपाची बी टीम आहे असं सांगायला मागे राहिले नाहीत. पण त्याच तेलंगणा राज्याची तुतारी आजच्या मुखपत्रात वाजवताना कौतुक करणं यातुन संपादकाची बुद्धी कशी कुणीकडे गतिरोधक पाजळत जाते हे दिसुन आलं. पंतप्रधान मोदी असोत किंवा गृहमंत्री अमित शहा असो ज्यांनी देशाचं नेतृत्व करताना सांस्कृतिक रूढी, परंपरेनुसार देश चालवुन दाखवला. ज्यावर सामान्य जनतेचा आणि मतदारांचा विश्वास बसला. ज्यांच्याकडे वैचारिक दृष्टी आहे म्हणूनच शत्रु राष्ट्र यांना त्यांची जागा दाखवत देशाची अस्मिता आणि स्वाभिमान जपण्याचं काम केलं, काश्मिरमधील 370 कलम असो किंवा आयोध्येत प्रभु रामचंद्र मंदिराची उभारणी असो ज्याची लढाई शेकडो वर्षे हिंदु बांधवांनी लढली आणि अस्मिता साध्य घटक हिंदु रक्षती नागरिकः हे प्रत्यक्षात करून दाखवलं. तरी अंध संपादकाला म्हणे यांना वैचारिक दृष्टी नाही. हा जावाईशोध केवळ व्यक्तिद्वेषातुन असुन काही तरी लिहिण्यानंतर मातोश्री आणि सिल्वर बंगल्याचे कर्ताकरविते आपलं कौतुक कसं करणार? याची चिंता रोज भासत असल्याने अकलेचे तारे लेखणीच्या माध्यमातुन तोडताना दिसतात. ज्या नेतृत्वाने देशाचा कारभार करताना इतिहास घडवला, खरं म्हणजे संजय राऊतांना त्याचं काही देणंघेणं निश्चित नसावं पण 370 कलम आणि प्रभु रामचंद्र मंदिर हे प्रश्न मार्गी लावल्यानंतर स्व. बाळासाहेब ठाकरेंनी देखील स्वर्गातुन पुष्पवृष्टी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर निश्चित केली असेल. पण अशा हुजरेगिरी संपादकाला ती कशी दिसणार? खरं तर ही कामगिरी चंद्र-सुर्य पृथ्वीवर असेपर्यंत अजरामर राहिल. त्यामागे नाव राहिल आणि इतिहासजमा कधीच होणार नाही. कारण हिंदुस्थानच्या भुमातेवर अस्मितेचं रोपटं लागवड करताना कर्तबगारीतुन सिद्ध केलेलं आहे. देशातील घराणेशाहीच्या राजकारणाला थारा न देता देशातील आणि राज्यातील प्रस्थापितांच्या प्रायवेट कंपन्या उद्धवस्त करण्याचं काम करून टाकलं. नरेंद्र मोदी कुटुंबवत्सल आहेत म्हणून देश हेच त्यांचे कुटुंब त्यातुनच नागरिकांची होत असलेली सेवा पण ज्या पंतप्रधानाची मातोश्री शंभरी पार करते तेव्हा चरणस्पर्श करण्यासाठी आजही पंतप्रधान स्वतःच्या वाढदिवसाला गुजरातमध्ये जात्ात हा आदर्श आणि शिकवण मोदी यांची आहे. कौरवाच्या भुमिकेत काम करणारे संजय ज्यांनी पाठीराख्या धृतराष्ट्राला अर्थात मातोश्रीच्या मालकाला पुर्णतः अंध करून टाकलं. मोदीचा परिवारवाद म्हणजेच या देशातील 138 कोटी जनता आणि तुम्ही व्यक्ती परिवार वादात आडकुन बालिश बहु बायकात बडबडला सारखी लेखणी चालवतात हीच शोकांतिका अग्रलेखीय संपादकाची म्हणावी लागेल. संपुर्ण देशात भाजप नेतृत्वाला मिळत असलेली संधी एकट्या भाजपाचे 17 हजार कोटी सदस्य जगाच्या पाठीवर एवढा दुसरा पक्ष मोठा नाही. तरीसुद्धा राऊतांच्या अंध लेखणीला भाजप हा लोकसहभागाचा पक्ष वाटत नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# कोणताही जीवात्मा दुखावला जाणार नाही हीच खरी अहिंसा

आधुनिक केसरी

**स्वतःची काळजी प्रत्येकाला असते .पण जो स्वतःची नाही तर इतरांची काळजी करतो तो परोपकारी महात्मा असतो .इतरांची काळजी करणं हिच खरी खुरी मानवता आहे.सृष्टी वरील कोणताही जीवात्मा हा शक्यतो आपल्या कृतीने दुखावला जाणार नाही याची काळजी आणि दक्षता घेणं अत्यंत गरजेचे असत .हिच खरी मानवता आहे पण मानवत काय असते याचाच विसर पडल तर मग आपण मानव असण्याला काही अर्थ उरतो का ? इजा म्हणजे फक्त शारिरीक हिंसा असते काही दिवस उपचार घेतले कि ती इजा पुन्हा बरी होते. पण मानसिक हिंसा हि सगळ्यात जास्त घातक असते. आपल्या मुळे एखाद्याचं मन दुखावलं जाणं हा हिंसेच्या प्रकारातील सगळ्यात मोठ आणि घातक प्रकार आहे .तसं पाहिलं तर मानसिक हिंसा हि विघातकच असते.**

अंहकार, द्वेष, स्वार्थ,मन भेद,आकस, विविध व्यसन,संगत,असे अनेक दुर्गुण हे या हिंसेचे सारथी असल्याने याचा आपल्या मन बुद्धी मध्ये प्रवेश आणि विस्तार झाला कि ते कधी आपल्या बुद्धी वर स्वार होऊन हिंसा घडुन आणतात याची खबर बात देखिल आपल्याला लागतं नाही. मन बुद्धी मध्ये वाईट विचार प्रवेश करण्यासाठी खुप अल्प वेळ लागतो पण तेच विचार बुद्धी मधुन बाहेर काढण्यासाठी कित्येक वर्षे लागतात कधी कधी तर ते विचार आपल्याला सोबत घेऊन जातात.पण ते सुटत नाहीत. महणुन याच गांभीर्य योग्य वेळी ओळखता येणं गरजेचं आहे .येण्यासाठी खूप कमी वेळ लागत असुन त्यासाठी फार विशेष परिश्रम करण्याची देखिल आवश्यकता लागत नाही. पण खरे परिश्रम करावे लागतात ते म्हणजे अहिंसक होण्यासाठी अहिंसा वृत्ती टिकवून ठेवण्यासाठी. मानसिक हिंसा ज्या मध्ये जीवन मार्गावर मार्गक्रमण करताना तत्सम अस कोणतही आचरण होणार नाही. हि जगातील सगळ्यात मोठी अहिंसा आहे .तर आपल्या कडुन कोणाचंही मन दुखावलं जाण तस वर्तन आचरण होणं हि सृष्टी वरील सगळ्यात मोठी हिंसा आहे .हिंसा म्हणजे फक्त शरिरावर ,जखम ,इजा , जीवतीस धोका निर्माण करणं ,किंवा वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान पोहचण म्हणजेच फक्त मर्यादित अर्थाने केलेल कृत्य म्हणजे हिंसा असं आपण ढोबळमानाने समजतो .पण खरया अर्थाने आपल्याला कडुन एखाद्याच मन दुखावलं जाण, किंवा आपल्या मुळे एखाद्याला पश्चात्ताप, मनस्ताप होण, मानसिक कुचंबणा, खच्चीकरण होण, उमेद धेय्य संपुष्टात येण, ताणतणाव येण, ताणव ग्रस्त मनस्थिती होण, वैचारिक गोंधळ निर्माण होण, दबावाखाली वावरण, एकंदरीत शारिरीक व मानसिक स्तरावरील भरून निघणार नाही अशा प्रकारचे नुकसान ही सगळ्यात मोठी हिंसा आहे.कारण शरिरावर झालेल्या जखमा ह्या भरून निघु शकतात .परंतु मनावर झालेली जखम हि जगातील कोणताही औषधाने उपचाराने भरून निघत नाही. म्हणून आपल्या कडून एखाद्याच मन दुखावलं जाण हि सगळ्यात मोठी हिंसा आहे. म्हणून कळत न कळत सुद्धा आपल्या कडून कोणाच मन दुखावलं जाणार नाही. याची काळजी दक्षता घेणं हे सदैव अहिंसक असल्याचं लक्षण आहे.मन , बुद्धी , वृत्ती,व अंतःकरणाने अहिंसक व्हा आपल्या मुळ इतर कोणताही जीव दुःखी होणारं नाही .याची दक्षता घ्या काळजी घेता आली पाहिजे. एखाद्याचे मन दुखावणे हि सगळ्यात मोठी हिंसा आहे हे सदैव लक्षात ठेवून आचरण केले तर आपल्या मध्ये असणारे सगळे सात्विक लोककल्याणकारी गुण नक्कीच प्रकट झाल्याशिवाय राहणार नाहीत. सृष्टीच सौंदर्य अहिंसेत आहे .सृष्टी वरील कोणत्याही प्रकारच्या जीवाला आपल्या मुळ वेदना दुःख होणार नाही .याची काळजी घेणं खुप गरजेचं आहे. एकमेका सहय करू अवघे धरू सुपंथ सृष्टीच्या रचनेतील सगळे पशु पक्षी प्राणी , वेगवेगळे जीव हे आपलं कर्म बंधन घेऊन आले आहेत . प्रत्येक जण आपापल्या आपल्या कार्यक्षेत्रात आपलं जीवन जगत आहे .मग इतरांना त्रास इजा होईल असं आचरण करण कित पत योग्य आहे .जखम करणं किंवा त्या उद्देशाने मारहाण करणं किंवा जीवीतास धोका निर्माण करणयाचा प्रयत्न करणं म्हणजे आपण साधारणतः हिंसा समजत असलो तरी मारहाण किंवा इजा जखम हि भरून निघणारी असते एखाद्या प्रकरणात हिंसा जीवघेणी ठरते. पण बहुतांश प्रकरणांत शारिरीक हिंसा दिर्घ काळ परिणाम करणारी नसते .मानव हा पृथ्वीवरील सगळ्यात बुद्धिमान शक्तिशाली बलाढ्य प्राणी आहे.पण आज आपण सृष्टी वरील इतर जीव सृष्टी सह परस्परांना कसं आशांत आणि अस्थिर करता येईल यासाठी जास्तीत प्रयत्नशील आहेत. या सगळ्या मध्ये आपण स्वतः ची व इतरांची शांती हिरावतो आहोत .याची जाणीव जागृती सध्या लोकांना राहिली नाही. याचे दुष्परिणाम हे आपल्याला सगळीकडे सध्या दिसत आहेत आणि हि परस्थिती हाता बाहेर जाऊ नये म्हणून योग्य वेळी सावध होण्याची आवश्यकता आहे.आणि आपल्या मुळं कोणालाही मानसिक त्रास होणार नाही .याची काळजी दक्षाता सगळ्यांनी घेतली पाहिजे. मानसिक हिंसा हि घातक असुन यावर फक्त ज्ञान हा एकमेव व सगळ्यात प्रभावी उपाय आहे. आपल्याकडे असणार ज्ञान आपल्याला या हिंसेच्या प्रभावातुन आपला बचाव करत म्हणून ज्ञान हा मानसिक हिंसे वरील सर्वतम प्रभावी उपाय आहे. अहिंसा हे सृष्टी चे सौंदर्य आहे आणि आपण त्याच संवर्धन करून संगोपन केले पाहिजे.हि काळाची गरज आहे. त्यामध्ये ही वैचारिक पातळीवर अहिंसक होण महत्वाचे आहे. मन बुद्धी विचार आणि कृती ने अहिंसक होण्यासाठी ज्ञान हाच एकमेव मार्ग आहे जो आपल्याला जीवनभर उपयोगी ठरू शकतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ज्ञान आणि शिक्षणाशिवाय पर्याय नाही : प्रा. शिंदे

## आर.के.एम. विद्यालयात शिक्षण काळाची गरज विषयावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लोकनेते ए टी पवार यांनी पायाभूत सुविधासाठी संघर्ष करीत आयुष्य घातलं, शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहचून आपले ज्ञान समाजासाठी वापरलं आणि समाजभिमुख कार्य उभे केले. सध्याची परिस्थिती बघता ज्ञान आणि शिक्षणाशिवाय पर्याय नसल्याचे मत व्याख्याते प्रा गणेश शिंदे यांनी व्यक्त केले.

कळवण तालुका छत्रपती स्मारक समितीच्या वतीने आमदार नितीन पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिक्षण, काळाची गरज या विषयावर व्याख्याते प्रा गणेश शिंदे यांच्या व्याख्यानाचे आर के एम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कळवण एज्यूकेशन संस्थेचे अध्यक्ष डॉ रावसाहेब शिंदे होते प्रमुख पाहुणे म्हणून आमदार नितीन पवार, नगराध्यक्ष कौतिक पगार, उद्योगपती बेबीलाल संचेती, कळवण बाजार समितीचे सभापती धनंजय पवार, जेष्ठ नेते नारायण हिरे मधुकर पगार, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष भूषण पगार, युवा नेते ऋषिकेश पवार,के के शिंदे, सुमनताई देवरे,आर के महाजन, राजेंद्र पवार उपनगराध्यक्ष तेजस पगार व्यासपीठावर होते.

व्याख्याते गणेश शिंदे मार्गदर्शन करताना पुढे सांगितले की, आई वडिलांची अपेक्षा प्रत्येक पाल्याकडून असते ती पूर्ण करण्यासाठी व सद्यःपरिस्थिती बदलण्यासाठी ज्ञान व शिक्षणाला पर्याय नाही हेच दिवस ध्येयावर लक्ष केंद्रीत करीत मोठी स्वप्न व यश संपादन करण्यासाठी आहे. आई-वडिलांचे स्वप्न व त्याची मान शरमेने खाली जाईल, असे कृत्य करू नका असे सांगून मोबाईलचा वापर किती करायचा हे तुमचे तुम्हीच ठरावा असे आवाहन केले.

वाईट मार्गाची प्रवृत्ती टाळत शिक्षण घेत जीवनाचा आनंद उपभोगा जिद्द, चिकाटीच्या जोरावर शिक्षणावर भर द्या, काळ व वेळेवर बदलणारे तंत्रज्ञान आत्मसात करूनच बदलावे लागणार आहे. चौकटीच्या पलीकडे जावून कामे करा. पदवी घेवून पॅकेजच्या मागे जावू नका हे लक्षात ठेवा. यासाठी बदलाची सुरूवात आपल्या पासूनच करण्याचे आवाहन प्रा शिंदे यांनी केले.




यावेळी आमदार नितीन पवार, डॉ रावसाहेब शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक राजेंद्र भामरे यांनी केले. सूत्रसंचलन राकेश हिरे तर आभार प्राचार्य जी.डी. रौदळ यांनी मानले.

कार्यक्रमास नगरसेवक राहुल पगार, गौरव पगार, जयेश पगार,नगरसेविका लता निकम,बाजार समितीचे संचालक सुधाकर खैरनार, शंकरराव निकम विठोबा बोरसे, शिवाजी सोनवणे, अविनाश पगार, रंजन देवरे, दादा निकम, शरद अहिरराव, गंगाधर शिंदे दादा निकम, सुनील महाले, प्रा राजेंद्र कापडे, प्रा शिवलाल पगार संदीप पगार, सागर खैरनार, पंकज पाचपिंड आदीसह शिक्षक, कर्मचारीसह आर के एम माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील व आदिवासी विकास प्रकल्पातील विद्यार्थी, विद्यार्थिनीं व्याख्यानाला मोठया संख्येने उपस्थित होते.

# मसाला किंग डॉ. धनंजय दातार यांचा 'आयकॉन ऑफ दुबई अॅवॉर्ड' पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :**दुबई येथे अदील ग्रुप ऑफ सुपरमार्केट्सचे संस्थापक व दूरदर्शी उद्योजक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांना रीटेल उद्योगातील त्यांच्या असाधारण योगदानाबद्दल इंडिया टुडे समूहातर्फे प्रतिष्ठेचा 'आयकॉन ऑफ दुबई अॅवॉर्ड' हा पुरस्कार देऊन नुकतेच गौरवण्यात आले आहे.

संयुक्त अरब अमिरातीत (युएई) दुबईमध्ये पाम जुमैरा येथील ताज एक्झॉटिका हॉटेलमध्ये झालेल्या शानदार समारंभात ज्येष्ठ राजकीय नेते व मुत्सद्दी डॉ. शशी थरुर यांच्या हस्ते व अनेक नामवंतांच्या उपस्थितीत डॉ. दातार यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात आला. इंडिया टुडे समूहाचे राजदीप सरदेसाई, नबिला जमील, अंजना ओम कश्यप व श्वेता सिंग यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



अदील ग्रुप ऑफ सुपर मार्केट्सचा ५० हून अधिक रीटेल सुपर मार्केट्स, पिठाच्या गिरण्या व मसाला कारखाने असा विस्तार आहे. आखाती देशात नोकरी-व्यवसायानिमित्त स्थाईक झालेल्या भारतीय समुदायाच्या वैविध्यपूर्ण चवींची पूर्तता करणारी उच्च दर्जाची खाद्य उत्पादने रास्त किंमतीत पुरवण्यात हा समूह महत्त्वाची भूमिका बजावत आला आहे. अस्सल स्वाद व काटेकोर दर्जा निकष राखत अस्सल उत्पादने पुरवण्याची बांधीलकी डॉ. दातार यांनी कायम निभावल्याने त्यांना संयुक्त अरब अमिरातीतील भारतीयांमध्ये प्रेमादराचे स्थान प्राप्त झाले आहे. आयकॉन ऑफ दुबई हा पुरस्कार केवळ डॉ. दातार यांच्या यशाचाच गौरव नसून त्यातून भारतीय समुदायाच्या खाद्य अनुभवाला समृद्ध बनवण्याप्रती त्यांची कटिबद्धताही अधोरेखित होते. व्यवसायात उत्कृष्टता व समाजसेवेप्रती बांधीलकी जोपासण्यात डॉ. धनंजय दातार करत असलेल्या अखंड परिश्रमांनी रीटेल क्षेत्रात गुणवत्तेचा एक वाखाणण्याजोगा मापदंड स्थापित झाला आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर कृतज्ञता व्यक्त करताना डॉ. दातार म्हणाले, आयकॉन ऑफ दुबई पुरस्कार मी नम्रतेने स्वीकारत आहे. दर्जेदार उत्पादने देऊन व भारताचा अस्सल स्वाद राखून आपल्या समुदायाची सेवा करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. मला मिळालेला हा पुरस्कार एकप्रकारे संपूर्ण अदील परिवाराचे परिश्रम व समर्पितता यांचाच पुरावा आहे. इंडिया टुडे समूहाने डॉ. दातार यांनी रीटेल उद्योगात बजावलेल्या असाधारण कामगिरीचा केलेला सन्मान हा त्यांची दुबईतील लोकप्रिय व्यक्तिमत्त्व ही ओळख अधिक दृढ करणारा आहेच, परंतु त्याबरोबर तो भारतीय समुदायासाठीही अभिमानास्पद आहे.

# हदगाव येथील महा हिंद लॅब रक्त तपासणी करणाऱ्यावर कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज


**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** तालुक्यात सध्या डेंगु,मलेरिया, हिवताप, काविळ, टायफाईड आणि इतर प्राण घातक विषांणुचा संसर्ग नेहमी तालुक्यात पसरत असल्याने रोगराई दिवसें दिवस वाढत आहे. वरील सर्व रोग निदान करण्यासाठी रक्त तपासणीतुनच रोग निदान सिध्द होते. व तसेच रक्त चाचणी अहवालानुसार रुग्णावर औषधी उपचार केला जातो. रक्त तपासणी केल्यानंतर २ ते ३ तासातच रक्त चाचणी अहवाल संबंधित रुग्णाला देणे बंधनकारक असते. उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथील कार्यरत एच एल एल लाईफ केअर लिमिटेड महा हिंद रक्त तपासणी प्रयोग शाळेत रक्ताचे नमुने घेण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी नियुक्ती करण्यात आले आहेत. सदरील रक्ताचे नमुने दुसऱ्या तालुक्याच्या प्रयोग शाळेत नेऊन रक्त तपासणी करुन सुध्दा रक्त तपासणी चाचणी अहवाल किमान ४ ते ५ दिवसानंतर हि रुग्णाला मिळत नाही. या करिता दिव्यांग विकास संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष समीर पटेल यांनी स्थानिक व जिल्हा आणि राज्य प्रशासनाला निवेदन दिले आहे.

गंभिर आजारी रुग्णाला व लहान मोठे शस्त्रक्रिया असलेल्या रुग्णाला रक्त तपासणी करिता व रक्त चाचणी अहवाल देण्यासाठी संबंधित कर्मचारी सतत टाळाटाळ करीत आहे. रक्ताचे नमुनेची तपासणी करण्यासाठी महा हिंद लॅबमध्ये कुठलेही प्रकारचे इ टि डी ट्यूब व ईतर रक्त चाचणी साहित्य लॅब मध्ये उपलब्ध नसतात. संबंधित कर्मचारी रक्त तपासणी अहवाल तात्काळ देत नाही. व तसेच या ठिकाणी कोणत्याही प्रकारची रक्त तपासणी चाचणी करीता प्रयोग शाळा व तांत्रिक यंत्रणा कार्यरत नसल्याने रक्त तपासणी केल्यानंतर सुद्धा किमान रुग्णाला चार ते पाच दिवसानंतर हि रक्त चाचणी अहवाल मिळत नाही. रक्त तपासणी करिता उप जिल्हा रुग्णालय येथे फार कमी मनुष्यबळ असल्याने सतत गंभिर आजारी रुग्ण, लहान मोठे शस्त्रक्रिया करणारे व्यक्ती, नवजात बालके ,गरोदर माता, वयोवृद्ध व्यक्ती, दिव्यांगाची येथे सतत गैर सोय व हेळसाळ केली जाते. उप जिल्हा रुग्णालय हदगाव येथे दररोज किमान ६०० ते ७०० आजारी रुग्ण आरोग्य तपासणी करिता येत आहेत. त्यापैकी काही रुग्णाला डेंगु, मलेरिया, काविळ, टायफाईड, लहान मोठे शस्त्रक्रिया, हिवताप असलेल्या रुग्ण उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेहमी शेकडो रुग्ण येथे भरती असतात. त्यापैकी गंभिर आजार असलेले नवजात बालके, दिव्यांग व्यक्ती, वयोवृद्ध आणि गरोदर माता यांना वारंवार रक्त व लघवी तपासणी करावी लागत आहेत. त्यामुळे हदगाव येथील कार्यरत असलेले महा हिंद रक्त तपासणी प्रयोग शाळेत तपासणी केल्यानंतर सुद्धा तात्काळ रक्त तपासणी अहवाल देत नसल्याने गंभिर आजारावर तात्काळ निदान होत नाही. आणि अति तिव्र आजारी असलेल्या रुग्णाला योग्य औषधी व उपचार मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना आपला जिव रक्त तपासणी अभावी गमवावा लागत आहे. रक्त तपासणी करीता गोरगरीब, नवजात बालके, दिव्यांग व्यक्ती, गरोदर माता, वयोवृद्ध व्यक्ती यांना या सुविधेचा तात्काळ लाभ मिळत नाही. यासाठी उप जिल्हा रुग्णालय येथील महा हिंद लॅबचे कंत्राटी परवाना तात्काळ रद्द करून उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे २४ तास रक्त व लघवी तपासणी अहवाल देणाऱ्या दुसऱ्या प्रयोग शाळेला कंत्राट देऊन उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे तात्काळ नियुक्ती करावी. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर सर्व दिव्यांगासह, व रुग्णासह आणि सर्व सामान्य नागरिकासह आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा दिव्यांग विकास संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष समीर पटेल यांनी दिला.

महाराष्ट्र Business Katta









# इतिहासाचा डोळस अभ्यास आणि छत्रपती शिवराय



प्रा.प्रशांत शिरुडे
संपर्क क्र. 9967817876

आधुनिक केसरी

**इतिहासाचे अवजड ओझे डोक्यावर घेऊन न नाचा करा पदस्थल त्याचे आणि चढूनी त्यावर भविष्य वाचा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विं.दा. करंदीकर सांगतात इतिहासातून मानवाला बोध घ्यायला हवा. परंतु मानव इतिहासाला कवटाळून बसतो. मग त्याच्या श्रद्धांना धक्का लागला की जाळपोळ, दंगली, आंदोलने त्यातून जीवित व वित्तहानी होतेच. खरं तर इतिहास म्हणजे समृद्ध भविष्याकडे नेणारा महामार्ग पण वर्तमान काळात विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचाही इतिहासाकडे बघण्याचा व अभ्यासण्याचा दृष्टिकोन हा खूपसा सकारात्मक दिसून येत नाही. त्याबद्दल त्यांच्या मनात अनेक गैरसमज असतात. जसे इतिहास म्हणजे होऊन गेलेल्या घटना.**

त्यांच्यावर आज चर्चा करण्यात काय अर्थ. कोळसा कितीही उगळला तरी काळा तो काळाच राहतो. इतिहास विषयाचा अभ्यास म्हणजे मेलेले मुडदे उखडून काढण्याचा प्रकार. इतिहास विषय उत्पन्नाचे साधन होऊ शकत नाही. इतिहासाच्या अभ्यासाने पोट भरत नाही, इतिहास म्हणजे केवळ सन, सनावळ्या, घटना, आणि दिनांक यांचे जंजाळ. इतिहास म्हणजे गणित, विज्ञान किंवा तंत्रज्ञान नव्हे की ज्याचा आजच्या काळात उपयोग होईल. इतिहास या विषयाचा राष्ट्राभिमानी शिक्षक या नात्याने मला हे योग्य वाटत नाही, मला त्यांना सांगावेसे वाटते की प्रत्येकच विषयाला स्वतःचा एक इतिहास असतो आणि तो अभ्यासल्याशिवाय आपण वर्तमानात त्यावर काम करू शकत नाही. आणि त्या संदर्भात भविष्यात प्रगतीच्या दिशाही निश्चित होऊ शकत नाहीत. खरंतर इतिहासाचा अभ्यास केल्याने आपल्या वर्तमानातील समस्या सुटण्यास निश्चितच मदत होते. त्यामुळेच भविष्य सुरक्षित होते. उदा. नुकत्याच येऊन गेलेल्या कोविड च्या साथीवर संपूर्ण जगाने व जगातील शास्त्रज्ञांनी उपाय शोधतांना हाच विचार केला की यापूर्वी जेव्हा-जेव्हा अशा प्रकारची साथ आली, तेव्हा-तेव्हा मानवाने त्यावर कशाप्रकारे मात केली. साधारणतः त्या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग करूनच आपण कोविड वरील प्रतिबंधात्मक नियमावली व प्रतिबंधात्मक लस शोधून काढण्याचा प्रयत्न केला. त्यात आपण यशस्वी झालो. कोविड वर विजय मिळवला. त्यामुळेच भविष्याकडे अधिक जोमाने मार्गक्रमण करण्यासाठी सक्षम झालो. हे केवळ आणि केवळ इतिहासाच्या अभ्यासातून घडले. वर्तमान काळात भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे उत्तर इतिहासात सापडते. इतिहासाचा योग्य अभ्यास केल्यास त्या प्रश्नाचे उत्तर त्वरेने मिळते. त्याचबरोबर आपल्याला कोणत्याही क्षेत्रात जर यशस्वी व्हायचे असेल तर त्या त्या क्षेत्राचा साद्यंत इतिहास माहिती असणं अत्यंत आवश्यक आहे. तो माहिती असेल तरच त्या क्षेत्रात आधी काय काम झाले ते कळू शकेल. वर्तमान कालखंडात त्यावर काम करतांना आता काय केले पाहिजे हे समजेल. अजून पुढे काय करायचे हे लक्षात येईल. त्यामुळे त्या क्षेत्रात आपण अधिक प्रगती करण्यास सक्षम होऊ. पण जर आपल्याला त्या क्षेत्राचा इतिहासच माहीत नसेल तर चांगले यश मिळेल याची खात्री देता येत नाही. याशिवाय गतकाळात होऊन गेलेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून इतिहासाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे असते. भूतकाळात झालेल्या चुका आपण खोडरबरने दुरुस्त करू शकत नाही, पण वर्तमानात त्या चुका पुन्हा होऊ नयेत म्हणून प्रयत्न करू शकतो. जो समाज आपला इतिहास विसरतो त्याचे भविष्य निश्चितच अंधकारमय असणार.

छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्याची स्थापना व विस्तार करताना ज्या संकटांचा सामना करावा लागला त्या संकटांवर मात करताना नियमितपणे इतिहासात, पुराणात घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास केल्याचे दिसून येते. थोडक्यात महाराजांनी इतिहासाचा सखोल अभ्यास केला होता. महाराजांनी बालपणात आईकडून रामायण, महाभारता सहित या भारत भूमीवर झालेल्या परकीय आक्रमकांच्या गोष्टी ऐकल्या. तशा रामायण महाभारता सहित अनेक गोष्टी सर्वच मुलांना सांगितल्या जातात. पण त्यातून शिवरायांनी जो बोध घेतला व त्याचे कालसापेक्ष जे अनुसरण केलं, ते छत्रपतींच्या कार्याचा अभ्यास करतांना आपल्याला पुन्हा-पुन्हा दृष्टीगोचर होताना दिसते. यातूनच महाराजांनी स्वराज्याची युद्धनीती- (वॉर पॉलिसी), युद्धरिती- (वॉर स्ट्रॅटेजी) तयार केली. युध्दनीती म्हणजे परक्यांचे भारतातून संपूर्ण निखंदन आणि युध्दरीती म्हणजे त्यासाठीच्या लढायांची रचना. उदा. शत्रुला आपल्या सोयीच्या रणक्षेत्रात आणून त्याचा संपूर्ण निःपात करणे. महाभारतात श्रीकृष्णाने जरासंधाच्या कालयवनासारख्या अत्यंत रणधुरंधर बलाढ्य सेनापतीला मुचकुंदाच्या गुहेत नेऊन कसे ठार मारले याचा अभ्यास केला असणार. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी त्याला आपल्या सोयीच्या ठिकाणी म्हणजे प्रतापगडाच्या पायथ्याशी आणण्यासाठी महाराजांनी आखलेली योजना. मी आपणास फार घाबरलोय, तुम्हीच या आणि मला हात धरुन सुलतानाकडे न्या, असे सांगून आपल्या सोयीच्या जावळीच्या घनदाट जंगलात प्रतापगडाच्या पायथ्याशी आणले. प्रत्यक्ष भेटीत अफजलखानाचा वध करताना वापरलेली वाघनखे ही यापूर्वीच्या कोणत्याही युद्धात वापरलेली दिसून येत नाहीत. पण पुराणकालीन कथांचा अभ्यास केला तर हिरण्यकश्यपूचा वध करताना भगवान नरसिंह यांनी ज्या प्रकारे वाघनखांचा उपयोग केला कदाचित तिथूनच महाराजांना वाघनखे वापरण्याची कल्पना सुचलेली असू शकते. आग्र्याच्या काळकोठडीत असताना तिथून बाहेर पडण्यासाठी महाराजांच्या मनात ज्या अनेक गोष्टी रुंजी घालत असतील. त्यामध्ये प्रामुख्याने महाभारतात दुर्योधनाने ज्या प्रकारे शकुनीच्या माध्यमातून लक्षागृहात पांडवांना ठार मारण्याची योजना केलेली असते व त्यातून पांडवांनी कशाप्रकारे स्वतःची सुरक्षित सुटका करून घेतली हे स्पष्टपणे सांगितलेले आहे. याची आठवण महाराजांना नक्कीच झाली असणार. कदाचित त्यातूनच प्रेरणा घेऊन महाराजांनी आग्र्याच्या काळ कोठडीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधलेला असू शकतो. आजही महाराजांच्या आग्रा सुटके बद्दल इतिहास अभ्यासक संशोधन करीत असतात व त्यातील गूढ उकलण्याचा प्रयत्न करतात. पण त्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराजांनी अशा प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा स्वतःचे मानसिक धैर्य खचू न देता पुढील आठ नऊ वर्षातच 350 पेक्षा जास्त किल्ले मिळवत राजाभिषेकापर्यंत मजल मारली. अशीच प्रेरणा नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीही महाभारतातून व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून घेतलेली दिसून येते. भारताच्या स्वातंत्र्यलढयासाठी ब्रिटिशांच्या नजर कैदेत असताना नेताजी सुभाषचंद्र बोस मोठ्या शिताफीने ब्रिटिशांच्या विख्यात हेरखात्याची नजर चुकवून मॉस्को मार्गे बर्लिनला पोहोचले व तेथून जपानला गेले. तेथे रास बिहारी बोस यांची भेट घेऊन आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्वीकारून ब्रिटिशांशी लढण्यासाठी भारताच्या ईशान्य भागात येऊन पोहोचले. मध्ययुगातील काही अपरिचित कारणांमुळे समुद्र लांघणे अयोग्य मानले जात होते. पण महाराजांनी रामायण महाभारतासहित पूर्वीच्या भारतीय राजांच्या विदेशी व्यापाराचा अभ्यास केला होता.



जसे हनुमानाने समुद्र उल्लंघन करतच श्रीलंकेत प्रवेश केला, इसवी सन पूर्व कालखंडा पासून सातवाहन, मौर्य, गुप्त सहित अनेक राजांचे पूर्व पश्चिमेकडील अनेक देशांशी समुद्रमार्गे व्यापार सुरू असल्याचे अनेक पुरावे मिळतात. यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांना समुद्रमार्गे आपल्यावर परकीय आक्रमणे होऊ शकतात. शिवरायांनी भविष्यातला हा धोका ओळखून साडेतीनशे वर्षांपूर्वीच समुद्रात स्वराज्याचे भक्कम आरमार उभारले. महाराजांनी सुद्धा स्वराज्याचा व्यापार समुद्रमार्गे सुरू केला होता. महाराजांनी युद्धात घोड्यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला. कारण वेगवान हालचाली करण्यासाठी त्यांचाच उपयोग होतो. त्यांनी शक्यतो शत्रूशी लढताना हत्तींदळाचा वापर केला नाही किंवा स्वतः हत्तीवर बसून सैन्याचे संचालन केले नाही. कारण युद्धात हत्तीचा वापर किंवा हत्तीदळाचा वापर हा वेगवान हालचालीस अडथळा ठरतो. ही गोष्ट यापूर्वीच्या अनेक युद्धांमध्ये दिसते. याशिवाय महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगर-दऱ्यांमध्ये हत्ती व अवजड तोफा घेऊन युद्ध करणे व्यावहारिक दृष्ट्या योग्यही नव्हते. इसवी सन 712 मध्ये मुहम्मद बिन कासिम व सिंध चा राजा दाहिर यांच्यात झालेल्या युद्धात राजा दाहिर हा हत्तीवर बसून तर मोहम्मद बिन कासिम घोड्यावर स्वार होऊन सैन्याचे संचालन करत होते. राजा दाहिर जखमी झाल्याने अंबारीत पडतो. आपला राजा पडला हे बघून त्याचे सैन्य रणांगणातून पळू लागते. परिणामी राजा दाहिरचा पराभव होतो.

1192 मध्ये सम्राट पृथ्वीराज चव्हाण व मोहम्मद घोरी यांच्यातील तराईच्या युद्धात सम्राट पृथ्वीराज चौहान हत्तीवर बसून तर मोहम्मद घोरी घोड्यावरून सैन्याचे संचालन करत असतो. युद्धात सम्राट पृथ्वीराज चौहानचा पराभव होतो. 1526 च्या पानिपतच्या पहिल्या युद्धात इब्राहिम लोधी हत्तीवरून लढत असतो तर बाबर घोड्यावरून त्याचा प्रतिकार करत असतो. या ठिकाणी इब्राहिम लोधीचाही पराभव होतो. त्यानंतर 1527 मध्ये खानवाच्या युद्धात पारंपारिक शस्त्रांच्या सहाय्याने राणासांगा हत्तीवरून सैन्याचे संचालन करतो तर तोफा व बंदूका च्या साह्याने बाबर घोड्यावरून आपल्या सैन्याचे संचालन करतो. युद्धाच्या ऐन धूम्रश्चक्रीत राणासांगाला तीर लागतो. युद्धात राणासांगाचा पराभव होतो. 1556 मध्ये पानिपतच्या दुसऱ्या युद्धात अकबर व सम्राट हेमु यांच्यातील युद्धात सम्राट हेमु हत्तीवरून युद्ध करत असतो. सम्राट हेमुच्या डोळ्याला अचानक बाण लागतो तो अंबारीत कोसळतो. तो कोसळल्याचे दिसताच त्याचे सैन्य पळू लागते. परिणामी त्याचा पराभव होतो. 1565 ला राक्षसतागडी च्या युद्धात विजयनगर व बहामनी (दख्खन मधील पाच मुस्लिम सल्तनती) राज्यांमध्ये झालेल्या युद्धात रामराया हत्तीवरून आपल्या सैन्याचे संचालन करत असतो. रामरायाच्या तोफखान्याचा प्रमुख ऐन वेळी फितुरी करतो. त्यामुळे त्याचे तोफगोळे शत्रू ऐवजी रामरायाच्याच सैन्यावर पडतात. परिणामी रामरायाचा हत्ती बिथरतो रामराया हत्तीवरून खाली उतरतो. आपला सेनापती दिसत नाही म्हटल्यावर सैन्याचे मनोधैर्य खच्ची होते. परिणामी रामरायाचा पराभव होतो. वर या देशातील काही महत्त्वपूर्ण युद्धांचा उल्लेख केलेला आहे की ज्यामुळे सत्ता बदल झाले. त्या युद्धात झालेल्या आपल्या पराभवाची इतर अनेक कारणे आहेत. पण महत्त्वाचे म्हणजे या प्रत्येक युद्धात राजे हे स्वतः हत्तीवर बसून सैन्याचे संचालन करतांना दिसतात . आपले राजे हत्तीवर दिसतात तोपर्यंत त्यांचे सैन्य इर्षेने लढताना दिसते. सैनिकांच्या निष्ठा राजाशी असत. पण राजा पडताच त्यांचे सैन्य रणांगणा बाहेर पडे. परिणामी आपण अनेक जिंकत असलेल्या लढाया पण गमावल्या. मात्र शत्रु घोड्यावर स्वार असे. त्यामुळे त्याच्या हालचाली जलद होत. परकीय आक्रमक अचानक हल्ला करत. ते आक्रमण करण्यासाठीच आलेले असत. त्याच वेळी भारतीय राजे शांतताप्रिय असल्याने त्यांची युद्धाची तयारी आक्रमकाएवढी नसे. आक्रमक कोणत्याही युद्ध नियमांचे पालन करत नसत. या उलट भारतीय राजे मानवीय दृष्टिकोनातून युद्धाच्या नियमांचे पालन करत. उदाहरणार्थ स्वतः प्रथम आक्रमण करत नसत. **क्रमश :**

# 'अण्णा भाऊ साठे चित्रपट महोत्सव'



आशिष निनगुरकर
संपर्क क्र. ९०२२८७९९०४

आधुनिक केसरी

**दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, ११ पोवाडे, एक प्रवासवर्णन आणि शेकडो लावण्या, छकडी, गाणी तसेच त्यांच्या कादंबऱ्यावर आठ चित्रपटे प्रदर्शित झाली आहेत. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिनिमित पुण्यात दरवर्षी चित्रपट महोत्सव भरवला जातो. यंदा हा महोत्सव ७ व ८ ऑक्टोबर रोजी होतोय. त्यानिमित्ताने घेतलेला हा वेध....**

पुण्यात गेल्या सहा वर्षापासून होत असलेला "कॉम्रेड अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव" ही एक महत्वपूर्ण सांस्कृतिक पर्वणी म्हणावी लागेल. २०१७ मध्ये या चित्रपट महोत्सवाला सुरुवात झाली. महाराष्ट्रात सांस्कृतिक जडणघडण करण्याचे काम अनेकांनी केले. त्यापैकी एक महत्वाचे व्यक्तीमत्व म्हणजे अण्णाभाऊ साठे. अष्टपैलू व्यक्तीमत्व असणाऱ्या अण्णाभाऊंनी शोषितांच्या बाजूने सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवला. लोकनाट्य जनक,शाहिर,कलावंत-साहित्यिक, दिग्दर्शन अशा अनेक क्षेत्रांत मुशाफिरी करून शोषितांच्या प्रती आत्मीयता दाखवली. साहित्यिक म्हणून अण्णाभाऊ साठे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे होते.त्यांच्या समकालीन अवस्थेत संकुचित झालेल्या मराठी साहित्याला सर्वसमावेश करण्याचे काम त्यांनी केले.शोषितांच्या जीवन संघर्षाला साहित्यात मानाचे स्थान देऊन साहित्याचे मापदंड बदलून मराठी साहित्य प्रभावी व समृद्ध केले.त्यांनी लिहिलेल्या अनेक कथा, कादंबरी यातून वास्तववादी चित्रण आजही काळाशी सुसंगत वाटणारे व सामाजिक आशय असणारे आहे.अण्णाभाऊ चित्रपटसृष्टीत अग्रणी होते.१९४० च्या दशकामध्ये अण्णाभाऊंनी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान दिले आहे. अण्णा भाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हातात डफ घेऊन संयुक्त महाराष्ट्राची चळवळ शाहिरीच्या माध्यमातून जनमानसात पोहचवण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.अशा थोर कलावंतांच्या नावाने मीडिया सोल्युशन व अण्णाभाऊ साठे चित्रपट महोत्सव समिती यांच्या संयुक्त आयोजनातून व महाराष्ट्र शासनाच्या मदतीने हा चित्रपट महोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडतो. या फेस्टिवल होण्यामागे संस्थापक- अध्यक्ष संदीप ससाणे यांचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहे. त्यांच्या कल्पक व धाडसी विचारांना या महोत्सवाच्या निमित्ताने एक वेगळे वलय निर्माण झाले आहे.त्यामुळे स्वतः दिग्दर्शक असलेले संदीप ससाणे उत्तम जाणकार असून त्यांनी या महोत्सवाची एक आगळीवेगळी मांडणी केली आहे. त्यामुळे हा सिनेमा महोत्सव इतर फिल्म फेस्टीवलपेक्षा वेगळा व मैलाचा ठरत आहे. हा महोत्सव म्हणूनच सर्वांना आपलासा वाटतो व भावतो.

महाराष्ट्रात व देशात जागोजागी अनेक चित्रपट महोत्सव भरतात. पण त्यांच्यात आणि अण्णाभाऊ साठे चित्रपट महोत्सवात सर्वात महत्वाचा असा फरक आहे. ग्लोबलायझेशननंतर भारतीय मनोरंजन उद्योगात प्रचंड तांत्रिक विकास झाला परंतु आशय नष्ट झाला आहे.तो नष्ट झालेला आशय पुरविण्याचे काम या फेस्टिवलच्या माध्यमातून होताना दिसत आहे. देश विदेशातून अनेक वेगवेगळ्या विषयावरच्या लघुपट व माहितीपट या महोत्सवात मोठ्या संख्येने दाखल होतात. बड्या प्रस्थापित चित्रपट महोत्सवांत मोजके अपवाद वगळता आता तशी विश्वासार्हता राहिलेली नाही, त्यामुळे नव्या कलाकार, दिग्दर्शकांसाठी हा महोत्सव एक नवी उर्जा देणारा ठरतो आहे. इतर प्रस्थापित महोत्सवांत केवळ चित्रपटांचे सादरीकरण होवून त्यावरच चर्चा



होते परंतु या महोत्सवात सामाजिक, राजकीय विषयांवर चिंतन केले जाते व त्यावर उपलब्ध झालेल्या प्रश्नांना प्रखर अशी वाचा फोडून त्यावर उपाययोजना शोधण्याचे उत्तम असे काम करते. हे या महोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अतुल पेठे, राजकुमार तांगडे, सयाजी शिंदे, उमेश कुलकर्णी, ज्योती सुभाष, सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर, नागराज मंजुळे, मेघराज राजेभोसले, राज काझी, प्रतिमा, विनायक, उमेश कुलकर्णी, हेमांगी कवी, अंकुश मांडेकर व विनायक लष्कर अशा कितीतरी दिग्गजांनी या महोत्सवात याअगोदर हजेरी लावली आहे आणि यावेळी देखील अनेक मान्यवर कलावंत या महोत्सवाला आवर्जून उपस्थित असणार आहेत. त्यामुळे या महोत्सवाची एक वेगळी उंची नावाप्रमाणेच वाढली आहे. या महोत्सवात पूर्ण लांबीचे पण चित्रपट आहेत त्यामुळे आपण आता लघू म्हणत नाही काही चित्रपट व माहितीपट एक ते दीड तासाचे आहेत.

यंदा या महोत्सवात एकूण ११० लघुपट व माहितीपट आले होते. त्यापैकी दर्जेदार असलेल्या ४० लघुपट व माहितीपटांचे स्क्रिनिंग या वर्षीच्या महोत्सवात होणार आहे व त्यावर विवेचनात्मक चिंतन होणार आहे. त्यापैकी दर्जेदार असलेल्या लघुपट व माहितीपट यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. तसेच कलाकार व तंत्रज्ञ यांना वैयक्तिक वेगवेगळी पारितोषिके दिली जाणार आहेत. या महोत्सवातून अण्णा भाऊंच्या सांस्कृतिक योगदानाची पुन्हा एकदा चर्चा सुरु झाली आहे. 'चित्रपट ही सर्व कलांची जननी आहे', असे लेनिन यांनी म्हटले होते व या कलेचे समाजपरिवर्तनातील महत्वपूर्ण योगदान अधोरेखित केले होते. भारतासारख्या जातवर्गीय देशात चित्रपटांसारख्या सामान्य लोकांवर प्रभाव गाजविणाऱ्या माध्यमाकडे परिवर्तनवाद्यांनी अधिक लक्ष देणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन या महोत्सवाने चित्रपट साक्षरतेचा व त्याअनुषंगाने या कलेतील परिवर्तनवादी आशयाला जनतेसमोर आणण्याचे मोठे काम सुरु केले आहे. एखादा महोत्सव पुण्यासारख्या महानगरात भरविणे हे काम ध्येयवेड्या तरुणांशिवाय कोण करु शकतो ? सचिन बगाडे व संदीप ससाणे यांनी प्रचंड कष्टातून हे अवघड काम साध्य केले आहे. त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच.

यंदा ६ व्या अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उदघाटन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट 'रेखा' दिग्दर्शक शेखर रणखांबे, हा चित्रपट दाखवून होणार आहे. त्यानंतर महोत्सवासाठी निवडल्या गेलेल्या अनेक दर्जेदार लघुपट व माहितीपट यांची विशेष पर्वणी असणार आहे.यातील स्क्रिनिंगसाठी निवडला गेलेला प्रत्येक लघुपट व माहितीपट स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करणारा असून अनेक महोत्सवांमध्ये पुरस्कारप्राप्त आहे.पुण्यातील राष्ट्रीय फिल्म संग्रहालयाच्या स्क्रिनिंग थिएटरमध्ये येत्या ७ आणि ८ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट महोत्सव रंगणार आहे. त्यावेळी अनेक दिग्गज कलाकार व तंत्रज्ञ यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तुम्हाला देशातील प्रश्न व समस्या जाणून घ्यायच्या असतील तर या फेस्टिवलमधून त्याची उकल प्रकर्षाने होते.कारण या महोत्सवात निवडले गेलेले लघुपट व माहितीपट आपले वास्तव प्रश्न अतिशय गंभीररीत्या मांडतात.जणूकाही त्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करतात. जख्खड झालेल्या मनाला विचाररुपी थप्पड मारण्याचे काम करतात. त्यामुळे पुण्यात दरवर्षी होत असलेला 'अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' भविष्य काळाची गरज असून नव्या हरहुन्नरी कलाकार व तंत्रज्ञ यांच्यासाठीचे एक हक्काचे व्यासपीठ आहे. दोन दिवसांचा होणारा हा चित्रपट महोत्सव रसिकांसाठी मोठी पर्वणी असणार आहे. त्यामुळे या चित्रपट महोत्सवाला आभाळभर शुभेच्छा....

# ऑस्ट्रेलियावरील विजयाने आत्मविश्वास बळावला



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**पुढील आठवड्यापासून वातावरण क्रिकेटमय होणार आहे. 50 षटकांची क्रिकेट विश्वचषक स्पर्धा सुरू होत आहे. जेव्हा-जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेची कोणतीही मोठी स्पर्धा आयोजित केली जाते तेव्हा टीम इंडियाकडून विजेतेपदाची अपेक्षा केली जाते. महत्त्वाचे म्हणजे यंदाचा यजमान भारत असल्याने यावेळी अपेक्षाही जास्त आहेत. तसेच सध्या एकदिवसीय, टी२० आणि कसोटी सामना या तिन्ही प्रकारामध्ये भारत पहिल्या क्रमांकावर आहे. आशिया चषकातील विजय आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील नुकतीच झालेली कामगिरीदेखील भारत विश्वचषक जिंकण्याचा प्रबळ दावेदार असल्याची साक्ष देत आहे. पण आव्हान सोपे नाही. जवळपास प्रत्येक संघातील महान खेळाडूंना भारतीय परिस्थितीची चांगली जाणीव आहे.**

इंडियन प्रीमियर लीगने केवळ भारतीय क्रिकेटचाच नव्हे तर संपूर्ण जगाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. आताच्या विश्वचषकातील सहभागी संघांमध्ये असे अनेक खेळाडू आहेत ज्यांनी आपल्या कामगिरीमुळे आयपीएल सुपरस्टारचा दर्जा मिळवला आहे.या खेळाडूंना भारतातील जवळपास प्रत्येक खेळपट्टीचे वर्तन कसे आहे, हे चांगलेच माहीत आहे. फ्रँचायझी संघांच्या विजयात हे खेळाडू महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.
फक्त पाकिस्तान आणि नेदरलँड्स सारखे संघ अपवाद असतील. भारत-पाक संबंध बिघडल्यामुळे पाकिस्तानी खेळाडूंना आयपीएलमध्ये खेळण्याचा फायदा मिळत नाही. अर्थात 5 ऑक्टोबर ते 19 नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या 13व्या क्रिकेट विश्वचषकासाठी दहाही संघ दावा करत आहेत.
विश्वचषकाच्या ताकदीच्या कसोटीवर म्हटलं तर कोणताही संघ लहान किंवा मोठा नसतो.
क्रिकेटमध्ये काहीही घडू शकतं आणि याचा फटका मोठ्या संघांनादेखील बसला आहे. आणि याचा इतिहास साक्षी आहे. सामन्याच्या दिवशी जो चांगला खेळेल तो जिंकेल. अफगाणिस्तान असो की श्रीलंका किंवा बांगलादेश, सगळेच समीकरण बदलवू शकतात.
पण भारतीय क्रिकेटप्रेमींची प्रार्थना एकच असणार की भारताने केवळ फायनलच खेळू नये नाही तर तो जिंकावा. पूर्वी जिंकण्यासाठी संघ आपल्या मोठ्या,स्टार खेळाडूंवर अवलंबून असायचे.
पण आता खास गोष्ट अशी आहे की प्रत्येक संघातील टॅलेंटदेखील आपला चमत्कार दाखवत आहेत. विश्वचषक संघात ज्यांना स्थान मिळाले नाही त्यांनीदेखील आपली उपस्थितीची जाणीव निवड समितीला करून दिली आहे. भारताने ज्या स्फोटक पद्धतीने आशिया चषक जिंकला त्यामुळे इतर संघांवर नक्कीच दडपण असणार आहे. विशेष म्हणजे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि हार्दिक पांड्यासारख्या दिग्गज खेळाडूंना बाहेर ठेवूनही आम्ही जिंकत आहोत. भारतासाठी स्वतःच्या मैदानावर आणि स्वतःच्या प्रेक्षकांमध्ये ही सुवर्णसंधी आहे. 2011 च्या विश्वचषक विजेतेपदाच्या यशाची पुनरावृत्ती करण्यासाठी!
28 वर्षांनंतर दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकल्यानंतर आता पुन्हा एकदा भारतासाठी मोठे यश वाट पाहत आहे. रोहित शर्माला संतुलित संघ मिळाला आहे. संघाकडे अनुभवासोबतच आश्वासक प्रतिभाही आहे. महत्त्वाचे म्हणजे अलीकडच्या काही दिवसांपासून वेगवान गोलंदाजदेखील सर्व परिस्थितींमध्ये चांगली कामगिरी करत आहेत.
जसप्रीत बुमराहच्या पुनरागमनाने संघाचे आक्रमण अधिक धारदार झाले. मोहम्मद शमीने आशिया कपमध्ये आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध मोहम्मद सिराजने आपली क्षमता दाखवली आहे. शार्दुल ठाकूरही




संघात आहे. पण त्यात फिरकीपटूंची भूमिका महत्त्वाची असेल, अशी अपेक्षा असणार आहे. भारताने कुलदीप यादव, रविंदर जडेजा आणि अक्षर पटेल यांना संघात ठेवले होते. मात्र अक्षर दुखापतग्रस्त असल्याने ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनला त्याची जागा मिळू शकते. प्रतिस्पर्धी संघांमध्ये अनुभवी फलंदाजांची मुबलकता लक्षात घेता त्यांचा अनुभव संघासाठी उपयुक्त ठरू शकतो. शुभमन गिल गेल्या काही काळापासून चांगली कामगिरी करत आहे. त्याने सलामीवीराची समस्या सोडवली आहे. यावर्षी तो पाच शतके झळकावत शानदार फलंदाजी करत आहे.
ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत शतक झळकावून श्रेयस अय्यरनेही संघात आपली दावेदारी वाढवली आहे. रोहित, विराट आणि केएल राहुल हे संघाचे आधारस्तंभ आहेत. फिटनेसच्या समस्येनंतर परतल्यानंतर राहुलने काही महत्त्वाच्या खेळी खेळल्या आहेत. हार्दिक पांड्या आणि रविंदर जडेजा अष्टपैलू म्हणून कायम राहतील.
28 वर्षीय बाबर आझमच्या पाकिस्तान संघाची कामगिरी त्याच्या भक्कम इराद्यांवर अवलंबून आहे. गोलंदाजीतील आक्रमकता हे पाकिस्तानचे बलस्थान आहे. शाहीन आफ्रिदी, रौफ आणि अनुभवी हसन अली हे त्रिकूट कोणत्याही फलंदाजाला अडचणीत आणू शकते. मात्र नसीम शाहच्या दुखापतीमुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. याचा परिणाम त्यांच्या संभावनांवरही होणार आहे. शादाब, नवाज आणि इमाम हे त्यांचे महत्त्वाचे फिरकीपटू आहेत. जर खेळपट्ट्या मदत करत असतील तर ते कमाल करू शकतात.पण पाकिस्तानला पुढे जाण्यासाठी बाबरचा स्वतःचा फॉर्म महत्त्वाचा ठरणार आहे. आशिया चषक स्पर्धेत रिकाम्या हाताने मायदेशी परतल्याने संघ निराश झाला असणार आहे.
या विश्वचषकासाठी सर्वात दुःखद बातमी म्हणजे वेस्ट इंडिज पात्र ठरू शकला नाही. पहिले दोन विश्वचषक जिंकणाऱ्या संघाने क्रिकेटला नेहमीच भक्कम फलंदाज आणि प्रतिस्पर्ध्यांच्या उरात धडकी बसवणारे, भितीदायक गोलंदाज दिले आहेत. आता त्याच्या गोलंदाजीची भीती तितकीशी राहिली नसली तरी त्याच्याकडे हेटमायर, रसेल, लुईससारखे मॅचविनिंग फलंदाज आहेत. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका हे सर्व बलाढ्य संघ आहेत. त्यांच्या खेळाडूंचा भारतात खेळण्याचा अनुभव प्रभावी ठरू शकतो. सर्व संघांना एकमेकांशी खेळावे लागणार आहे, त्यामुळे क्रिकेटप्रेमींनी रोमांचकता अनुभवण्यासाठी तयार राहावे.

# टमाटे फेकून देणारा शेतकरी पाहिला अन्...

आधुनिक केसरी

जेष्ठा गौरी आवाहनाच्या दिवशी, गुरुवारी अहमदपूर ते लातूर प्रवास करताना लातूर रोडच्या शिवारातील एक शेतकरी टेंपोभर टमाटे रोडच्या कडेला फेकून देताना आम्ही पाहिला! ते विदारक चित्र पाहून शेतकऱ्यांना कोणी वाली नाही? शेतकऱ्यांची दयनीय अवस्था कधी संपणार? शेतकऱ्यांच्या मालाला व भाजीपाल्याला हमीभाव केव्हा मिळणार?या प्रश्नांनी भंडावून सोडले. अवघ्या एक महिन्यापूर्वी टमाटे दोनशे रुपये किलो दराने मिळत होते आणि आज टमाट्यांचा भाव फक्त दहा रुपये किलो आहे.जेव्हा टमाट्यांचा भाव वाढला होता तेव्हा त्याचीच चर्चा सगळीकडे होत होती.सोशल मिडिया वर तर टमाटे खरेदी करताना घराची कागदपत्रे अथवा जमिनीचा सातबारा गहाण ठेवतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले होते.सांगायचा मुद्दा हा आहे की केव्हातरी चुकून शेतकऱ्यांच्या शेतमालाचा व भाजीपाल्यांचा भाव वाढला की त्याची खवंग चर्चा होते. परंतु जेव्हा शेतमालाचा भाव पडतो आणि वैतागून शेतकरी टमाटे व इतर भाजीपाला रोडवर फेकून देतो तेव्हा त्याची चर्चा मात्र कोणीच करीत नाही. कृषीप्रधान देश असलेल्या भारतात शेतकऱ्यांची ही दूरावस्था कधीतरी संपुष्टात यावी आणि राजकीय लोकांनी व सत्ताधारी प्रवर्गाने शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. नुसत्या पोकळ घोषणा काय कामाच्या?



आम्ही भारतीय लोक मॉलमध्ये गेल्यावर तेथील वस्तू मुकाटपणे आहे त्या दराने खरेदी करतो परंतु भाजी मार्केटमध्ये मात्र भाजीपाला खरेदी करताना घासाघीस करतो, भाव कमी करण्यासाठी शेतकऱ्यांसोबत हुज्जत घालतो ही मानसिकता सुध्दा बदलण्याची खरी गरज आहे. दिवसरात्र शेतकरी शेतात राबून धनधान्य व भाजीपाला पिकवतात आणि आम्ही तो शेतीमाल कवडीमोल भावाने खरेदी करण्याची मानसिकता बाळगणार असू तर हीच मानसिकता शेतकऱ्यांच्या मुळावर उठतेय. तेव्हा समस्त भारतीयांना एकच विनंती की शेतकऱ्यांचा शेतीमाल व भाजीपाला खरेदी करताना योग्य त्या किंमतीला खरेदी करावा. त्यांनाही लेकरं बाळं आणि वृध्द आईवडिल असतात याची नेहमीच जाणीव ठेवा. शेतकरी हे साऱ्या जगाचा पोशिंदा आहेत,ते जगले तरच आपण सगळे जीवंत राहू हे ही ध्यानात घ्या. तेव्हा या प्रसंगी बॅंकांनाही सांगावे वाटते की तुम्ही उद्योगपतींना व कारखानदारांना झटपट कर्ज देता पण शेतकऱ्यांना कर्ज द्यायला तुमचा हात आखडतो. तो आखडता हात जरा सैल करा आणि शेतकऱ्यांना कर्ज देऊन तर बघा. सहा माही किंवा वार्षिक हप्ता सर्वात अगोदर शेतकरी फेडतील याची प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही. शेतकरी सुखी तर आपण सगळे सुखी.

बबन दामोदर गुळवे
९५४५४४२६४८

# अभिनेत्रीला स्वत:चाच चित्रपट रखवालदाराने पाहू दिला नाही

आधुनिक केसरी

**ही चित्रपटसृष्टी अत्यंत गंमतीदार आहे. तीत नेहमीच नवनवीन घटना पाहावयास मिळतात किंवा कानावर येतात. साठाव्या दशकात अशीच एक गंमतीदार घटना घडली होती. एका चित्रपटाच्या शुभारंभाचा खास खेळ (प्रीमिअर) एका चित्रपटगृहात आयोजित करण्यात आला होता. प्रकार असा घडला, की त्या चित्रपटात भूमिका करणारी एक अभिनेत्री त्या खास खेळाला उपस्थित राहण्यासाठी चित्रपटगृहावर पोहोचली तेव्हा दरवाजावरच रखवालदाराने तिला अडविले.**

तुम्ही वयाने लहान असल्यामुळे हा प्रौढांसाठीचा चित्रपट तुम्हाला पाहता येणार नाही, असे रखवालदाराने तिला बजावले आणि तिला आत जाऊ दिले नाही. या अनपेक्षित घटनेमुळे ती अभिनेत्री कमालीची हिरमुसली आणि तो चित्रपट न पाहताच घरी परतली. ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून त्या होत्या आपल्या सगळ्यांच्या परिचयाच्या नामवंत अभिनेत्री नूतन बहल ऊर्फ नूतन ! नूतन यांचा जन्म ४ जून, १९३६ या दिवशी मुंबईत झाला. त्यांच्या घरात चित्रपट व्यवसायाचे वातावरण होते. त्यांचे वडील कुमार सेन समर्थ चित्रपट दिग्दर्शक होते तर मातोश्री शोभना समर्थ प्रख्यात अभिनेत्री होत्या. या दांपत्याची थोरली कन्या नूतनने ती अवघी ८ वर्षांची असतानाच आपल्या वडिलांनी दिग्दर्शित केलेल्या 'नल दमयंती' या चित्रपटात बाल कलाकार म्हणून एक भूमिका केली होती. १९५० साली नूतन यांनी वयाच्या १४ व्या वर्षात पदार्पण केले आणि आपल्या मातोश्री शोभना समर्थ यांनी निर्माण केलेल्या `हमारी बेटी' या चित्रपटाद्वारे आपल्या चित्रपटाच्या कारकिर्दीला प्रारंभ केला. त्याच्या पुढच्याच वर्षी म्हणजे १९५१ साली प्रदर्शित झालेल्या `नगीना' या चित्रपटात त्यांनी भूमिका केली. प्रदर्शनाच्या प्रमाणपत्रासाठी चित्रपट प्रमाणपत्र मंडळाकडे (सेन्सॉर) `नगीना' चित्रपट पाठविण्यात आला तेव्हा मंडळाने त्याला `ए' (म्हणजे `फक्त प्रौढांसाठी) प्रमाणपत्र दिले. नूतन आपला हा चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहावर गेल्या तेव्हा चित्रपटगृहाच्या रखवालदाराने त्यांना दरवाजावरच अडविले. मी या चित्रपटात काम केले आहे असे रखवालदाराला समजावून सांगण्याचा नूतन यांनी कसोशीने प्रयत्न केला; पण त्याने नूतन यांचे लहान वय पाहून त्यांना आत जाऊच दिले नाही. परिणामी त्यांना दरवाजावरूनच माघारी परतावे लागले. त्यानंतर १९५२ साली वयाच्या १६ व्या वर्षी नूतन `मिस इंडिया' या बहुमानाच्या मानकरी ठरल्या. १९५५ साली प्रदर्शित झालेल्या `सीमा` या अमिय चक्रवर्तीदिग्दर्शित चित्रपटामुळे नूतन यांना नवी ओळख मिळाली. त्या चित्रपटात त्यांनी बंडखोर नायिकेची व्यक्तिरेखा साकारली होती. त्यांच्या कसदार अभिनयाची प्रेक्षकांकडून प्रशंसा होऊ लागली आणि अशा उत्तम अभिनयामुळे त्यांना `फिल्मफेअर`चे सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले. पन्नासच्या दशकातील चित्रपटांमधे नायिका बहुतांशी साडीच परिधान करीत असत ; पण १९५८ साली प्रदर्शित झालेल्या `दिल्ली का ठग' या चित्रपटात नूतन यांनी परिधान केलेल्या खास पोहण्याच्या पेहरावाची त्याकाळी बरीच चर्चा झाली होती. हे एक धाडसी पाऊल मानले गेले होते. अशा पेहरावाबद्दल त्यांना टीकेलाही तोंड द्यावे



लागले होते. परंतु नंतर `सुजाता' आणि बंदिनी' या दोन चित्रपटांमधे नूतन यांनी अत्यंत मर्मस्पर्शी अभिनय करून धीट अभिनेत्री ही आपली प्रतिमा तर पुसून टाकलीच शिवाय टीकाकारांची तोंडेही बंद केली. स्वित्झर्लंडहून अभिनयाचे प्रशिक्षण घेऊन आलेल्या नूतन यांनी कथ्थक नृत्य आणि संगीताचेही शिक्षण घेतले होते. त्यांनी `हमारी बेटी', `छबिली' आणि `पेइंग गेस्ट' या चित्रपटांमधे गीतही गायिले होते. `सीमा', `पेइंग गेस्ट', `सुजाता', `बंदिनी', `सरस्वती चंद्र', `मिलन', `मैं तुलसी तेरे आंगन की' अशा एकापेक्षा एक बहारदार चित्रपटांमधील `बंदिनी' हा चित्रपट त्यांच्या अभिनयाच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरला. `सुजाता' या चित्रपटात त्यांनी अस्पृश्य मुलीची व्यक्तिरेखा साकारली होती. त्यांनी चेहरा आणि डोळे यातून जे भाव प्रकट केले ते संवादाशिवायच सगळे काही सांगून गेले.
`सरस्वती चंद्र' या चित्रपटापासून स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या नूतन यांना विविध पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले होते. पाचवेळा `फिल्मफेअर' पारितोषिक पटकाविणाऱ्या नूतन यांना भारत सरकारने `पद्मश्री' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता. नूतन यांचा वयाच्या तेविसाव्या वर्षी भारतीय नौसेनेतील एक अधिकारी लेफ्टनंट कमांडर रजनीश बहल यांच्याशी विवाह झाला. त्यांचे सुपुत्र मोहनीश बहल हेही अभिनेते आहेत. नूतन यांची नात आणि मोहनीश यांची कन्या प्रनूतन यांचा तोंडवळा बराचसा आपल्या आजीसारखाच (नूतन) असून त्या गायिका आहेत. अभिनेत्री नूतन यांनी सुमारे ४० वर्षे चित्रपट अभिनयाच्या क्षेत्रावर राज्य केले. त्यानंतर दुर्दैवाने कर्करोगासारख्या असाध्य आजाराने त्यांना ग्रासले. परंतु ही गोष्ट त्यांनी कोणापासूनही कधी लपवून ठेवली नाही. आपल्या आयुष्याचे आता थोडेच दिवस उरले आहेत, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली असावी म्हणूनच त्यांनी आपल्या निर्मात्यांना आपापले चित्रपट लवकरात लवकर पूर्ण करावयाची विनंती केली होती. अखेर पडद्यावरील सौजन्याची प्रतिमूर्ती असलेल्या आणि गोड स्मितहास्य करणाऱ्या या प्रतिभावंत अभिनेत्रीचे १९ फेब्रुवारी, १९९१ या दिवशी मुंबईत वयाच्या ५५ व्या वर्षी निधन झाले.

अनिल रा. तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे
९२२६१६०६५४

# पनवेल महानगरपालिकेच्या चार शववाहिन्या सेवेत दाखल

## महापालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना शववाहिकेची सेवा मोफत

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** पनवेल महापालिकेच्यावतीने महापालिका हद्दीत राहणाऱ्या नागरिकांच्या सेवेसाठी चार शववाहिनी गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या असून नुकताच शववाहिनींचा लोकार्पण सोहळा आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोर आमदार प्रशांत ठाकूर , नगरपरिषद प्रशासनाचे आयुक्त तथा संचालक मनोज रानडे, आयुक्त गणेश देशमुख, आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

या लोकार्पण कार्यक्रमास महापालिका भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त वैभव विधाते, लेखा परिक्षक निलेश नलावडे, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

वेळेत शववाहिनी उपलब्ध न झाल्याने अनेकदा मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना त्रास सहन करावा लागतो.अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी नगरसेवक यांनीही महापालिकेने प्रत्येक प्रभाग समितीसाठी एक शववाहिका खरेदी करावी अशी मागणी केली होती.त्याप्रमाणे नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन पनवेल महापालिकेने प्रत्येक प्रभाग समितीसाठी एक अशा चार शववाहिनीची खरेदी केली असून आता त्या सेवेत दाखल केल्या आहेत. सुरूवातीची एक शववाहिका व नवीन चार अशा ५



शववाहिका आता महापालिकेच्या ताफ्यात आहेत. या शववाहिका महापालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना महापालिका हद्दीमध्ये मोफत सेवा देणार असल्याचे आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी महापालिकेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमामध्ये जाहिर केले आहे.तसेच त्या पालिका क्षेत्राबाहेर नेणाऱ्यास माफक दरात सेवा उपलब्ध होणार आहे.नागरिकांनी शववाहिकेसाठी महापालिकेच्या ०२२-२७४५८०४०/४१/४२ या क्रमांकावरती संपर्क साधवा.

महापालिकेच्यावतीने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना नेहमीच उत्तम आरोग्यसेवा देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहे. महापालिकेच्यावतीने सध्या १२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व चार आरोग्य वर्धिनी कार्यरत आहे.त्याचबरोबर नागरिकांना रूग्णवाहिकांच्या सेवेतही वाढ करण्यात आली असून वाहन विभागामध्ये सध्या ६ रूग्णवाहिका आहेत.

# स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचा इतिहास तरुणांसमोर मांडणे आजच्या काळाची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत असतांना ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यासाठी कर्वेनगर येथील निरामय योग चिकित्सा केंद्र व जागृती प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने "भारत माँ की जय हो" हा नाट्य अभिवाचन प्रयोग सांगीतिक रित्या 'निरामय योग चिकित्सा केंद्र'च्या सभागृहात संपन्न झाला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) हे उपस्थित होते.

ते आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले,"कुलदीप धुमाळे लेखक, दिग्दर्शक व अभिवाचक असलेल्या 'जागृती प्रतिष्ठान' ने सन १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यापासून १९४७ दुसऱ्या व यशस्वी लढ्यातील काही क्रांतिकारकांचा धावता आलेख अतिशय उत्तमरित्या सादर केला ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या आयुष्याची आहुती दिली,बलिदान दिले त्यांचे स्मरण रहावे व नव्या पिढीने खरा इतिहास समजून घ्यावा,आपल्या देशाचा जाज्वल्य इतिहासाचे स्मरण व्हावे,पुर्वजांचे शौर्य व पराक्रम माहिती करून देण्यासाठी शालेय विद्यार्थ्यासाठी असे नाट्यप्रयोग सर्व शाळांमध्ये सादर करावे ज्यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची जागृती निर्माण होईल असे प्रतिपादन प्रदीप बापट यांनी केले.

कार्यक्रमास एअर व्हाइस मार्शल जयंत इनामदार (निवृत्त), एअर कमोडर अरुण इनामदार( निवृत्त), राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर संघचालक उदयन पाठक,नगरसेविका मिताली सावळेकर ह्यांची मुख्य उपस्थिती होती.

कुलदीप धुमाळे यांनी ह्या स्वातंत्र्यलढ्यातील रोमांचित करणारे प्रेरक प्रसंग ह्या नाट्य अभिवाचन द्वारे रसिकांसमोर सादर केले.या कार्यक्रमास डॉ ओंकार धुमाळे, दत्ता काळे,अरुंधती धुमाळे,या कलाकारांची उत्कृष्ट साथ होती. नेपथ्य प्रकाश माधव जोशी व बालाजी शिंदे ह्यांचे होते. स्वातंत्र्य लढ्यातील रोमांचित करणारे प्रेरक प्रसंग व राष्ट्रभक्तीपर गीते सादर करण्यासाठी अतिशय सुंदर ह्यांनी साथ दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस, शहीद भगतसिंग, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक,तात्या टोपे,वासुदेव बळवंत फडके, झांशीची राणी, सरदार वल्लभभाई पटेल, स्वातंत्र्यवीर सावरकर,मदनलाल धिंग्रा, गोपाळ गणेश आगरकर आदी क्रांतिकारकांच्या कार्यांवर गीताद्वारे व अभिवाचन द्वारे प्रकाश टाकण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत 'जागृती प्रतिष्ठान'चे अध्यक्ष कुलदीप धुमाळे यांनी शाल,रोप देऊन केले.कार्यक्रमाची सुरवात अरुंधती धुमाळे ह्यांच्या ईशस्तवनाने झाली. सूत्रसंचालन प्रकाश देशपांडे यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास दीनदयाळ शोध संस्थानचे गणेश पाठक, निरामयचे उमेश होले, कर्वेनगर,कोथरूड, वारजे भागातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, नागरिक, योग साधक, व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रात्री उशिरापर्यंत कर विभागाचे कामकाज सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** नागरिकांना कर भरणे सुलभ व्हावे यासाठी रिसोड नगरपरिषदेतर्फे ऑनलाइन प्रणाली राबविली जात आहे. त्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू असून कर विभागाचे कर्मचारी त्यात गुंतले आहेत. त्यामुळे नगरपरिषद कर विभाग रात्री उशिरापर्यंत काम करत आहे. ऑनलाईन काम लवकर पूर्ण करण्यासाठी रात्री उशिरापर्यंत काम सुरू आहे. अशी माहिती कर विभागाचे कर निरीक्षक अब्दुल अजीज यांनी दिली आहे. घरपट्टी आणि नळ टॅक्स भरण्यासाठी नागरिकांना कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. त्यासाठी ऑनलाइन यंत्रणा राबविली जाणार आहे. मात्र, नागरिकांना कर भरणे सोपे व्हावे, यासाठी कर विभाग शनिवार, रविवार सुट्टीच्या दिवशीही काम करत आहे. याचा फायदा विशेषत शासकीय नोकरी करणाऱ्या लोकांना होत आहे. जे सुट्टीच्या दिवशी कर विभागात येऊन आपला कर भरू शकतात. मात्र लवकरच सुरू होणाऱ्या ऑनलाइन प्रणालीमुळे नागरिकांना अधिक सुविधा मिळणार असून नागरिकांचा वेळही वाचणार आहे. अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.



ऑनलाइन कर भरण्यासंबंधीचा अहवाल वरिष्ठांना पाठवण्यात आला. काही किरकोळ काम बाकी आहे, लवकरच हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे."
**सतीश शेवदा, मुख्याधिकारी.**



सदर प्रणाली सुविधा देण्यासाठी व त्यांचा वेळ वाचविण्यासाठी प्रभावी ठरणार आहे. कर विभागाचे अधिकारी व कर्मचारी हे काम वेगाने करण्यात व्यस्त आहेत.
**विजयमाला आसनकर, नगराध्यक्षा रिसोड.**



यादी आणि कर संबंधित माहिती अपलोड करण्यासह काही तांत्रिक कामे करणे बाकी आहे. लवकरच ही ऑनलाइन प्रणाली नागरिकांना सेवा देण्यास सुरुवात करणार आहे. **अब्दुल अजीज, कर निरीक्षक**



# पारडी येथील जि.प.शाळेत शिक्षण परिषद मोठ्या उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारडी येथे दि.(४) आक्टोबर 2023 रोजी केंद्र कन्या लोहा अंतर्गत चालू शैक्षणिक सत्रातील माहे ऑक्टोबर- 2023 ची तिसरी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच संभाजी पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी सर्जेराव टेकाळे, केंद्र प्रमुख बाबुराव फसमले, के. मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख डी.आर. शिंदे, शिक्षक नेते बी वाय चव्हाण, ग्रामसेवक मंचनवाड गोविंद, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विठ्ठल डिकळे, उपसरपंच गोविंद डिकळे, ग्रा.पं. सदस्य अरूण पवार, बंडु पवार, लक्ष्मण रोकडे, व्यंकट डिकळे, त्र्यंबक पवार, माधव डिकळे, शंकर डिकळे,नंदु गायकवाड आदींची उपस्थिती होती.

प्रथमता शाळेच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत गेट समोर हळदी, कुंकू, सेंट, गंध, अक्षदा लावून करण्यात आले.तर शिक्षण परिषदेच्या प्रारंभी सुरुवात प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करुन झाली. जि.प.प्रा.शाळा पारडी येथील विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायले.पारडी शाळेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल व पुष्पहार घालून स्वागत केले.शाळेतील चिमुकल्यांनी विविध गीतावर सुंदर नृत्य सादरीकरण करून उपस्थितांची मन जिंकले. तत्पूर्वी जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सर्जेराव टेकाळे यांनी उपस्थित सर्व केंद्रातील शाळेच्या मुख्याध्यापकांना सहशिक्षकांना शाळेची प्रगती राबवत असलेले विविध उपक्रम, याचा जणू पाढाच वाचला तर जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी हे संस्थेच्या शाळेपेक्षा किती अव्वल आहेत हे त्यांनी आपल्या मनोगताद्वारे स्पष्ट केले. केंद्रप्रमुख फसमले यांनी संकुलातील शाळेचा शैक्षणिक व प्रशासकीय कामावर आपल्या मनोगत्वाद्वारे प्रकाश झोत टाकला. यावेळी केंद्रातील शाळेतून आलेले धावरी चे बी वाय चव्हाण,रायवाडी चे बी टी केंद्रे, पिंपळगाव ढगे शाळेचे जे एस ढवळे, शेलगावचे सी. एन. मुलुकपाडे, कारेगावचे यु बी केंद्रे, धानोरा चे दिलीप सोनवळे, हळदव शाळेचे नागनाथ सानप ,मलकापूर शाळेचे वसमतकर या सह त्यांचा स्टाफ तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालकवर्गांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालाघाटे डी.पी.यांनी व मुख्याध्यापक माधव किसवे यांनी केले तर आभार प्रदर्शन देशमुख यांनी केले. शेवटी सर्वांनी रुचकर जेवणाचा आस्वाद घेतला व शिक्षण परिषदेची सांगता झाली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव डिकळे, मुख्याध्यापक किसवे एम.एल.यांसह सहशिक्षक बालाघाटे डी.पी. कदम मॅडम, देशमुख सर, इंगोले मॅडम,गंगाखेडकर मॅडम करण्यासाठी यांनी परिश्रम घेतले.

# संभाजी ब्रिगेड वाशिम जिल्हाध्यक्षपदी अर्जुन खरात, रिसोड तालुकाध्यक्षपदी रुपेश बाजड

आधुनिक केसरी न्यूज





**वाशिम :** संभाजी ब्रिगेड वाशिम जिल्ह्याची कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली असून त्यामध्ये जिल्हाध्यक्षपदी अर्जुन पाटील खरात तर रिसोड तालुका अध्यक्षपदी रुपेश पाटील बाजड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश महासचिव सुभाषराव बोरकर यांच्या उपस्थितीत नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विवेकानंद ठाकरे तर प्रमुख उपस्थितीमध्ये नगरपरिषद माजी सभापती संतोष चराटे संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव रवी मोरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संभाजी ब्रिगेडच्या वाशिम जिल्हा अध्यक्षपदी अर्जुन पाटील खरात तर रिसोड तालुका अध्यक्षपदी रुपेश पाटील बाजड यांचे नियुक्ती करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेड ही मराठा समाजाच्या इतिहास, वर्तमान आणि भविष्यातील प्रश्नांवर अभ्यासू आणि आक्रमक पद्धतीने काम करणारी सामाजिक संघटना आहे. ती पुरोगामी, विज्ञानवादी आणि प्रागतिक विचारसरणीचे समर्थन करते. मराठा समाजाच्या प्रश्नांवर काम करत असतानाच समाजातील सर्व जातीधर्माच्या घटकांसोबत सलोख्याचे संबंध प्रस्थापित करुन आपापसातील दरी कमी करण्यासाठी संभाजी ब्रिगेडने नेहमी पुढाकार घेतला आहे. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने आपल्याकडील वेळ, बुद्धी, श्रम, कौशल्य व पैसा यापैकी जे शक्य असेल दान देऊन, समाजाप्रती असणारे आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडत राहावे. हा संभाजी ब्रिगेडचा विचार आहे. असे प्रतिपादन प्रदेश महासचिव सुभाष बोरकर यांनी व्यक्त केले आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष विनोद पाटील खडसे, विनोद पाटील बोडखे, दीपकराव शेवाळे, रमेश पाटील सदार, शालिक पवार, महेश सरनाईक, रामेश्वर राऊत, अमोल मगर, सुनील इंगळे, विजय काकडे, पांडुरंग मंडलिक, सुरेश गिरी, रामेश्वर खरात, मंगेश बोरकर, अजय जाधव, एकनाथ जाधव, संतोष सपकाळ, माधवराव जाधव आदींची उपस्थिती होती.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# लंडनमध्ये उभारणार शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

## सुधीर मुनगंटीवार : पारंपरिक मराठमोळ्या पद्धतीने मुनगंटीवारांचे जल्लोषात स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**लंडन :** छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे एक करोड कोहिनूर ओवाळून टाकावे असा राजा होय. जेव्हा गोठ्यातली गाय आणि घरातली माय धोक्यात येते, क्रुरता आपली सिमा ओलांडते तेव्हा एक तर देव अवतार घेतो किंवा शिवबा अवतार घेतात; छत्रपती शिवाजी महाराज आमच्यासाठी देव जरी नसतील तरीही देवापेक्षा कमी नक्कीच नाहीत, या महानायकाचा अश्वारूढ पुतळा लंडनच्या भूमित उभारण्यासाठी मी आणि महाराष्ट्र सरकार पूर्ण सहकार्य करेल, तुम्ही पुढाकार घ्या मी पुतळा देईन अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना सुधीर मुनगंटीवार यांनी येथे दिली. विजापूरचा मुगल सरदार अफजलखानाचा कोथळा ज्या वाघनखांनी महाराजांनी बाहेर काढला ती वाघनखे परत मिळविण्यासाठी ब्रिटनच्या



व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाशी यशस्वी करार केल्यानंतर ना. मुनगंटीवार यांचा लंडनच्या स्थानिक मराठी बांधवांनी भव्य समारंभ आयोजित करुन सत्कार केला. या सोहळ्यात ते बोलत होते. ना. मुनगंटीवार यावेळी म्हणाले की, मला जेव्हा सूचना केली की लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा एक सुंदर पुतळा उभा करावा, तेव्हा मला अतिशय आनंद झाला; मी लगेच संमती दिली. यासाठी महाराष्ट्र सरकार पूर्ण शक्तीने तुमच्या पाठिशी उभे राहील. छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमी विचार विश्वात पोहचावा अशी आमची अपेक्षा आहे. हा विचार जगातील प्रत्येक देशापर्यंत, देशातील प्रत्येक राज्यापर्यंत, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यापर्यंत, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यापर्यंत, तालुक्यातील प्रत्येक गावांपर्यंत, गावातील प्रत्येक घरापर्यंत, घरातील प्रत्येक आई-बहिणी पर्यंत, पोहचविण्याचा संकल्प शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या ३५० व्या वर्षपूर्तीनिमित्त महाराष्ट्र शासनाने केला आहे. यासाठी सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे असेही ते म्हणाले. लंडनच्या मराठी बांधवांचे आभार मानताना ना. मुनगंटीवार म्हणाले, आयुष्यामध्ये अनेक आनंदाचे क्षण येतात त्यापैकी आजचा एक आनंदाचा क्षण आहे. तुमच्या सर्वांची भेट घेताना, तुमच्याशी संवाद साधताना, तुमचं दर्शन घेताना मलाही मनापासून आनंद होतोय. जगातील १९३ देशात देशांत सर्वांत श्रेष्ठ भारत असून त्यात आमचा महाराष्ट्र महान आहे. ते म्हणाले मी भाग्यवान आहे, सांस्कृतिक मंत्री म्हणून शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षी काम करण्याची संधी मिळाली. हिंदवी स्वराज्यावर आक्रमण करणाऱ्या अफजलखानाची कंबर उखडून टाकण्याचे सौभाग्य मला मिळाले; त्याचे उदात्तीकरण आम्ही सहन करु शकत नाही. आग्र्याच्या किल्यात जेथे महाराजांचा अपमान झाला तेथेच भव्य दिव्य स्वरूपात शिवजयंती साजरी करुन अभिवादन केले, राज्यात ठीकठिकाणी जाणता राजा महानाट्याचे प्रयोग असे कितीतरी उपक्रम राबविण्याची संधी मिळाली. आमचा राजा शूर होता, वीर होता, हिंदवी स्वराज्याचा संस्थापक होता; त्यामुळे मराठी मातीशी नाळ जुळलेल्या प्रत्येकाच्या हृदयात फक्त शिवबाच असावा असे आवाहन शेवटी त्यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामंजस्य करार करण्यास ना. सुधीर मुनगंटीवार लंडनला येणार हे कळल्यापासूनच स्थानिक शिवप्रेमी मराठी बांधव उत्साहित होते. मंगळवारी दुपारी व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्तुझियम जवळ ना. मुनगंटीवार पोहोचताच पारंपरिक मराठमोळ्या वेषात, ढोलताशांच्या गजरात त्यांचे स्वागत या महाराष्ट्र मंडळाने केले. सामंजस्य करार झाल्यानंतर अतिशय देखणा सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी आयोजित करण्यात आला; स्फुर्तीगीत, पोवाडा, पारंपरिक नृत्य, छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रसंग अशा विविध छटांचा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.




# साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**गल्लेबोरगाव :** येथे झालेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये साई पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या 14 वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहेत. 19 वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या दोन्ही संघाचे संस्था अध्यक्ष किशोर पाटील नलावडे व बंडू शिंदे, सोमिनाथ आबा तुरेवाले तसेच प्राचार्य गोपाल अधाने, उपप्राचार्य गिरधर जाधव, प्राध्यापक अतुल जाधव, रामेश्वर मते, ज्ञानेश्वर अधाने, ज्ञानेश्वर नलावडे, संदीप चव्हाण,अक्षय गोसावी,सौरभ दहातोंडे, प्राध्यापिका ज्योती वायसळ, शितल नलावडे, साक्षी जैस्वाल,वर्षा लोंढे, कालिंदा जंजाळ, रिना जैस्वाल, रेणुका देवकर, जयश्री भांगरे, कल्पना नलावडे,राज्यश्री राणे यांनी संघातील खेळाडूंचे अभिनंदन करून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पाटोदा ग्रामीण रुग्णालयात बायोमेट्रिक थम मशीन बसवा : नीलाताई पोकळे

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** ग्रामीण रुग्णालय म्हणजे बाहेरुन देखणे आतून फेकणे आसाच काही प्रकार ग्रामीण रुग्णालयात पाहिला मिळत आहे. माघील काही महिने आरोग्य विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे झाल्यामुळे सर्व डॉक्टर मुख्यालयी राहत आसत यामुळे रुग्णांना योग्य वेळी उपचारही मिळत आसत मात्र आयुक्त तुकाराम मुंडे यांची बदली होताच पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचा कारभरात बदल झालेला पाहिला मिळत आसुन पाटोदा ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर व कर्मचारी



वेळेवर यत नसल्याने रुग्ण व रुग्णाच्या नातेवाईकाना ताटकळत वाट पाहत बसावी लागते तसेच रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी रहाण्याचे आदेश असताना काही डॉक्टर व कर्मचारी जिल्ह्याच्या व इतर ठिकाणा वरुन ये जा करतात यामुळे ग्रामीण रुग्णालयात कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नाहीत यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालयात बायोमेट्रिक थम मशीन बसवण्यात आल्यावर डॉक्टर कर्मचारी वेळेवर उपस्थित राहतील व रुग्णांना वेळेवर उपचार मिळतील यामुळे आरोग्य प्रशासनाने पाटोदेकराचा अंत न पाहता या गंभीर विषयावर तात्काळ लक्ष घालून काही अनर्थ घडावा याआधीच तात्काळ उपयोजना कराव्यात नाहीतर याचे परिणाम खुप भयंकर दिसतील यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालयात बायोमेट्रिक थम मशीन बसवण्यात यावा अशी मागणी भारतराष्ट्र समितीच्या आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच्या नेत्या निलाताई पोकळे यांनी केली आहे.

# महिलेची पर्स गहाळ; पोलिस ठाण्यात तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी तालुका येथील बस स्थानकामध्ये दी२०/९/२०२३ रोजी कुमारी अंबिका त्र्यंबक धालगडे हिची पर्स गहाळ झाली आहे. यासंदर्भात वाशी पोलीस स्टेशन येथे श्रीकृष्ण शामराव गायकवाड यांनी दि-३/१०२०२३ तक्रार दाखल केली असून, त्या पर्समध्ये कुमारी अंबिका त्र्यंबक धालगडे हीचा बारावी सोडल्याचा दाखला व व इतर शैक्षणिक कागदपत्रे आहेत. सदरील पर्स कोणाला आढळून आल्यास त्वरित +918767849150या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मु पो वाशी येथील श्रीकृष्ण शामराव गायकवाड यांनी केले आहे.

या गुन्ह्यातील पुढील तपास वाशी पोलीस स्टेशन मधील पो.कॉ.शंकर लोंढे हे करत आहेत.



# फर्दापूर येथे अनुसूचित जाती मोर्चा तालुका अध्यक्षपदासाठी निवडीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** रावसाहेब पाटील दानवे साहेब केंद्रीय रेल्वे कोळसा व खान राज्यमंत्री, यांच्या आदेशाने व सुरेश पाटील बनकर महाराष्ट्र प्रदेश चिटणीस व महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष इद्रिस मुलतानी अल्पसंख्यांक आघाडी सुहास भाऊ सिरसाठ छत्रपती संभाजीनगर भाजपा जिल्हाध्यक्ष यांच्या सूचनेनुसार फर्दापूर येथील शासकीय विश्रामगृहात भारतीय जनता पार्टी सोयगाव तालुक्याची अनुसूचित जाती मोर्चा तालुकाध्यक्ष निवडीसाठी बैठक झाली. दोन नावे तालुकाध्यक्ष पदासाठी इच्छुक आहेत त्यांचे नाव पक्षाकडे पाठविण्यात आले. या बैठकीसाठी भारतीय जनता पार्टी पक्षाचे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हासचिव मेघराजजी चौंडिये व किशोरजी जगताप भाजपा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष व भाजपा नेते जयप्रकाश चव्हाण व सोयगाव तालुका अध्यक्ष बद्री भाऊ राठोड समाधान भाऊ, गजानन सिरसाठ, दीपक मानकर, कुमावत मिस्तारी, बलांडे, शेख रशीद, आण्णा तांगडे, वसंत बनकर व सोयगाव तालुक्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी आदी उपस्थित होते.



# परतूर शहराध्यक्षपदी सुनीता भगवान काटकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** राष्ट्रवादी युवतीच्या परतूर शहराध्यक्षपदी सुनीता भगवान काटकर यांची नियुक्ती राष्ट्रवादी युवती जिल्हाध्यक्ष शीतल कैलास बोराटे यांनी केली आहे. परतूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष शीतल कैलास बोराटे, मराठा महासंघाच्या जिल्हाध्यक्षा मंगल कोरडे, सुमन साळवे, सविता पावडे, उषा गाते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमात सर्वानुमते परतूर शहराध्यक्ष पदी सुनीता भगवान काटकर यांची निवड करीत सत्कार करून नियुक्ती पत्र देण्यात आले. या निवडीबद्दल सुनीता काटकर यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# नाथसागरातील सौरऊर्जा प्रकल्पाला विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथसागर जलाशयावरील राज्य व केंद्र शासनाच्या ' नियोजित सौर ऊर्जा प्रकल्पासाठी स्थळपाहणी करण्याची परवानगी देवुन पाहणी चालु असून असल्याच्या हलचाली वरुन या प्रकल्पाला पैठण येथील कहार समाज , मच्छीमार, भिल्ल, समाजाने विरोध सुरू केला असून ९ ऑक्टोबर रोजी पैठण तहसीलवर मोर्चा काढण्यात येणार आहे. नाथसागराच्या काठावर असलेल्या नेवासा व शेवगाव , गंगापूर व पैठण ( जि . छत्रपती संभाजीनगर ) या तालुक्यांतील तब्बल ११८ गावांमधील मासेमारी जी व्यवसाय बंद होण्याची भीती यामुळे व्यक्त केली जात आहे. जवळपास हजारोच्या संख्येने कुटुंब मत्स्य व्यवसायावर अवलंबून आहेत, अशी माहिती कहार समाज पैठण च्या वतीने दिली. याबाबत तहसीलदार सारंग चव्हाण व पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना कहार समाज संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.



राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद. मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

## फुलंब्रीमध्ये मनोज जरांगे यांची सोमवारी सभा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात मनोज पाटील जरांगे यांचा ९ ऑक्टोबर रोजी दौरा असल्याने सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सकल मराठा क्रांती मोर्चा व समाज बांधवांची बैठक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात मंगळवारी (ता. ३) ऑक्टोबर रोजी पार पडली. या बैठकीला सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली होती. श्री जरांगे सध्या महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात भेटी देत असून ९ ऑक्टोबरला

तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांना संबोधित करण्यासाठी श्री जरांगे पाटील येत आहे. यावेळी त्यांचे जंगी स्वागत करण्याचा निर्णयबैठकित घेण्यात आला.

या बैठकीला सकल मराठा समाज बांधवांसह काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी शरद पवार गट राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. त्यामुळे शहरात हरिनामाच्या गजरात पुष्पवृष्टी करत मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करण्याचे आयोजन सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने या बैठकीत करण्यात आले आहे. ९ ऑक्टोबरला सर्व मराठा समाज बांधवांनी बाजार समिती परिसरात दुपारी तीन वाजता हजर राहावे असे आवाहन सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे

# खान्देशात पुन्हा मागासवर्गीयांवर बहिष्कार अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपी अजून मोकाट

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** पारोळा तालुक्यातील मोडाले पिंपरी येथील आदिवासी आणि बौध्द समाजावर बहिष्कार टाकला आहे असा आरोप स्थानिक गावकऱ्यांनी केला आहे.

गावातील काही गाव गुंडांवर अ‍ॅट्रॉसिटी केस केली म्हणून आदिवासी व बौद्ध समाजावर बहिष्कार टाकण्याची घटना उघडकीस आली आहे आदिवासी व बौद्ध समाजाच्या लोकांना पिठाची गिरणी वर दळण दळू दिल जात नाही दूध दिले जात नाही किराणा दिला जात नाही व कामावर घेऊन जात नाही व त्यांना पारोळा पर्यंत यायला प्रवासी रिक्षात बसू दिला जात नाही व त्यांना सांगतात तुम्ही केस माघारी घ्या नाहीतर तुम्हा महार भिलाना गावातून हाकलून लावू अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट मधील 25 आरोपींना अद्यापही अटक केलेली नाही ही माहिती



ऑल इंडिया पॅंथर सेना धुळे जिल्हा युनिटला कळल्याने धुळे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी पारोळाकडे धाव घेतली व मोडाळे पिंपरी गावातील आदिवासी व बौद्ध ग्रामस्थांना घेऊन पारोळा पोलीस स्टेशन येथे निषेध मोर्चा काढण्यात आला व तेथील पोलीस निरीक्षक सुनील पवार साहेब यांना निवेदन देऊन या सर्व विषयावर चर्चा करण्यात आली व पीआय साहेबांनी ग्वाही दिली. यापुढे असं होणार नाही व अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्टमधील सर्व आरोपींना लवकरात लवकर अटक करू व आदिवासी बांधवांवर जो खोटा गुन्हा दाखल केलेला आहे तो लवकरच मागे घेऊ असे आश्वासन पॅंथर सेनेला देण्यात आले आहे. यावेळी पिंपरी येथील रहिवासी ग्रामस्थ उपस्थित व धुळ्यातील ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे धुळे जिल्हा अध्यक्ष सागर मोहिते, धुळे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब बळसाने, महिला जिल्हा उपाध्यक्ष अनिताताई सोनवणे,धुळे जिल्हा महासचिव आनंद अमृतसागर, युवक शिंदखेडा तालुका अध्यक्ष समाधान मंगळे, दिपक मंगळे पारोळ्यातील सामाजिक कार्यकर्ते योगेश महाले, सामाजिक कार्यकर्ते राहुल सरदार व अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्यमंत्री शिंदे यांना महाकाली महोत्सवाचे आमंत्रण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्री महाकाली माता महोत्सव ट्रस्ट च्या वतीने चंद्रपूरमध्ये मागील वर्षीपासून ५ दिवसीय भव्य महाकाली महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित राहून चंद्रपूरकरांचा आनंद द्विगुणित करावा यासाठी चंद्रपूर चे आमदार तथा महोत्सवाचे मुख्य संयोजक किशोर जोरगेवार यांनी श्री महाकाली माता महोत्सव ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथील मंत्रालयात भेट घेत श्री माता महाकाली महोत्सवाचे निमंत्रण दिले. यावेळी श्री महाकाली माता महोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष अजय जयस्वाल, बलराम डोडाणी, एमआयडीसी इंडस्ट्रीज चे मधुसुदन रुंगठा , मिलिंद गंपावार आदिंची उपस्थिती होती.

चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकालीची महती राज्यभरात पोहचावी यासाठी आपण महाकाली महोत्सवाची सुरुवात केली असून यावर्षी या महोत्सवात मा. मुख्यमंत्री साहेब यांनी उपस्थित रहावे, अशी विनंती महोत्सव ट्रस्टच्या वतीने केली



आहे. मुख्यमंत्री महोदयांनी देखील चंद्रपूर ला येण्याबाबत सकारात्मकता दाखवली आहे. यावेळी महोत्सव ट्रस्टच्या वतीने निमंत्रण पत्रिकेसह माता महाकालीची मूर्ती भेट स्वरुपात मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवामधे लखबिरसिंह लख्खा यांचे जागरण, सुप्रसिद्ध गायीका अनुराधा पौडवाल यांचा संगीताचा कार्यक्रम, युवा कीर्तनकार सोपान कन्हेरकर यांचे किर्तन, मराठी गायिका वैशाली सावंत व निरंजन बोबडे यांच्या भव्य कार्यक्रमासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नवरात्राच्या शेवटच्या दिवशी नवमी ला माता महाकालीचा पालखी प्रदक्षिणा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात सुप्रसिद्ध गायिका ईशरत जहॉ यांच्यासह विविध राज्यांतील विविध पथक आपाआपल्या कलांसह सहभागी होत आहेत. या महोत्सवात चंद्रपूरकरांसह महाराष्ट्रातील भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महोत्सवाचे संयोजक आमदार किशोर जोरगेवार महोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष अजय जयस्वाल व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## ब्रिलियंट स्कूलचा विवान यादव अ‍ॅबॅकसमध्ये देशात दुसरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज खंडाळा-बावडा येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांने अ‍ॅबॅकस स्पर्धेतून देशात दुसरा क्रमांक मिळवित उत्तुंग भरारी घेणारे यश मिळविले आहे. विवान गणेश यादव असे या चिमुकल्या विद्यार्थ्याचे नाव असून तो एल.के.जी च्या वर्गात शिकत आहे. सातारा येथे २ ऑक्टोबर रोजी संपन्न झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील अ‍ॅबॅकसच्या परीक्षेमध्ये लहान गटातून विवान यादव याने देशात द्वितीय क्रमांक प्राप्त करत यश मिळविले. विवानच्या ह्या यशाचे ब्रिलियंट इंग्लिश स्कूलच्या संस्थापकांसह शिक्षकवृंद व पालकवर्गाने विशेष कौतुक केलेले आहे.विवान यास शाळेतील शिक्षकवृंद तसेच प्राचार्या सुदर्शना जाधव, आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गौतम



भोसले, उपाध्यक्ष जयकुमार खरात,सचिव स्नेहल खरात तसेच सक्सेस अ‍ॅबॅकसच्या पाटील मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.विवानच्या या यशाचे कौतुक संपूर्ण जिल्ह्यांतून होत आहे. वयाने लहान असूनही त्याच्याकडे असणारी असामान्य बुद्धिमत्ता पाहून ब्रॅण्ड ॲम्बेसिटर आणि सिने कलाकार तसेच स्वराज्य रक्षक संभाजी या टीव्ही मालिकेतील प्रथितयश कलाकार अमोल कोल्हे यांनी देखील विवान याचे खूप कौतुक केले आहे.

## पहूर ग्रामीण रुग्णालयात आरोग्य मेळावा ३२५ रुग्णांची तपासणी; १० रुग्णांवर शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे दि.३०/९/२३ रोजी आयुष्यमान भव आरोग्य अभियाना अंतर्गत पहूर येथील ग्रामीण रुग्णालयात आज झालेल्या आरोग्य तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबिराचा सव्वा तीनशे रुग्णांनी लाभ घेतला. दहा रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ग्रामीण रुग्णालय आज आयुष्यमान भव आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. आरोग्य मेळाव्यात गर्भपिशवी कुटुंब कल्याण पाच शस्त्रक्रिया तर चरबीच्या गाठींच्या पाच लहान शस्त्रक्रिया करण्यात आल्या. रक्तदाब, क्षयरोग, कुष्ठरोग, मुखरोग आदी सुमारे ३२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी रेड प्लस ब्लड सेंटरतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन सानप यांनी रक्तदान करून रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन केले. याप्रसंगी जॉईंट डायरेक्टर डॉ. बोरसे, डॉ. किरण पाटील, आर. एम. ओ. डॉ. सुपे, डॉ. आकाश चौधरी, पहूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. हर्षल चांदा, डॉ. समाधान वाघ, डॉ. नरेश पाटील आरोग्य दूत अरविंद देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. डॉ . गिरधारी जेधे, डॉ. मनोज तेली, डॉ. राहूल माळी, भूलतज्ञ डॉ . दिपक ठाकूर, डॉ. अतुल सोनार यांच्या पथकाने शस्त्रक्रिया केल्या. डॉ. यासिर खान, नजमोददीन तडवी, डॉ. देशमुख, यांच्यासह पहूर ग्रामीण रुग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी, पोलीस ठाणे, पत्रकार संघटना, ग्रामपंचायत, मंडळ, आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांचे सहकार्य लाभले. सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आरोग्य मित्र म्हणून भूमिका बजावली. पहूर परिसरातील रुग्णांनी मोठ्या संख्येने शिबिराचा लाभ घेतला.



# जटवाडा घाटातील सुरक्षेसाठी बसविली जाळी

## अबब... खर्च 82 लाख : नागरिक अचंबित

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील जटवाडा -काटशेवरी जैतखेडा रस्ता जटवाडा घाटात सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत दरड पासून वाहनधारक प्रवासी नागरिकांना सुरक्षा मिळावी म्हणून नुकतेच कोपऱ्या लगत जाळी लावण्यात आली आहे. याचा खर्च ब्यांशी लाख ऐकल्यावर नागरिक आचंबित व आश्चर्यचकित झाले आहे. खुलताबाद तालुक्यातील जटवाडा -काटशेवरी जैतखेडा रस्ता जटवाडा घाटात यापूर्वी पावसाळ्यात एक दोनदा दरड कोसळून महाकाया दगडं रस्त्यावर आली. सुदैवाने कुणी याच्या लपेट्यात आले नाही. परंतु पावसाळ्यात पावसाने रिमझिम संततधार पाऊस सुरू राहिल्यास जटवाडा घाटात दरडातून दगडं सुटतात व सरळ मुख्य रस्त्यावर येतात व असी भिती सतत पावसाळ्यात बनून राहते तसे सुचना म्हणून विभागाने मोठ्या ऐवजी छोटे फलक दोन्ही बाजूला लावली आहे. ते दिसूनही येत नाही. परंतु वाहनधारकांची सुरक्षा म्हणून घाटाच्या कोपऱ्यावर जेथे दगडं निखळतात तेथे गत सप्टेंबर महिन्यात काही ठिकाणी वरच्या बाजूला लोखंडी जाळी जे की दगडात होल मारुन लावण्यात आली आहे. जेणेकरून दरडच्या वरील बाजुचे दगडं सरळ मुख्य रस्त्यावर येणार नाही याची खबर दखल साबांवि ने घेतली आहे. परंतु लोखंडी जाळी लावण्याचा खर्च ब्यांशी लाख झाल्याचे नागरिकांनी ऐकल्यावर अचंबित होत आश्चर्य व्यक्त केले आहे. तर सुरक्षा दिल्याने वाहनधारक प्रवासी नागरिकांनी आभार व अभिनंदन ही केले आहे.

# अनुभवाचे खोटे प्रमाणपत्र सादर केल्याने पोलिसांत तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मनपा आरोग्य विभागात झालेल्या कंत्राटी भरतीदरम्यान अनुभवाचे खोटे प्रमाणपत्र सादर करून दिशाभूल व फसवणुक केल्याबद्दल दोन उमेदवारांविरुद्ध महानगरपालिकेद्वारे सिटी पोलीस स्टेशन गांधी चौक येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. जुन महिन्यात मनपा आरोग्य विभागातर्फे एएनएम या पदासाठी कंत्राटी तत्वावर १८ पदे भरण्यासंबंधी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. यात अनेक उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. पात्र होण्यास इतर कागदपत्रांसोबतच अनुभव प्रमाणपत्र सुद्धा मागविण्यात आले होते. यात शितल मेश्राम यांनी सीएचएल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांचे तर प्रगती शंकर ढोले यांनी सिम्स हॉस्पिटल, नागपुर येथे काम केले असल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र सादर केले. मात्र मनपाद्वारे कागदपत्रांची तपासणी केली असता सदर नावाच्या उमेदवाराने येथे काम केले नसल्याचा अहवाल प्राप्त झाला. नौकरी मिळविण्यास अनुभवाचे खोटे प्रमाणपत्र सादर करून चंद्रपूर महानगरपालिकेची दिशाभूल व फसवणुक केल्याने आरोग्य विभागामार्फत सिटी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. रिक्त पदांची अथवा कंत्राटी पदांची भरती दरम्यान कुठल्याही प्रकारचे खोटे कागदपत्रे सादर करून उमेदवारांनी आपल्या भविष्याचे नुकसान न करून घेण्याचे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# जीरेकरनगर येथे आ.फारुख शाह यांच्या हस्ते अभ्यासिकेचे भूमिपूजन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील संपूर्ण रस्ते गटार व मूलभूत सोयी सुविधांसाठी आ.फारुख शाह हे प्रयत्न करीत असून त्याला आजपर्यंत यश आलेले आहे. तसेच शहराच्या विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी शहरात एकूण चार ठिकाणी अभ्यासिका होणार आहे शहरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांना तोंड देण्यासाठी व अभ्यास करून स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी हे अभ्यासिका महत्वपूर्ण भूमिका निभावणार आहे. धुळे शहरात एकूण चार ठिकाणी अभ्यासिका होणार आहेत त्यात विटाभट्टी देवपूर साक्री रोड कबीर गंज तसेच जिरेकर नगर येथे अभ्यासिका होणार आहे.

दिनांक पाच ऑक्टोबर रोजी दूध डेरी रोड जीरेकरनगर येथे नगरसेवक परवीन अग्रवाल यांच्या घराजवळ अभ्यासिकाच्या 25 लाख रुपये कामाच्या शुभारंभ आ. फारुख शाहयांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळीस लक्ष्मीबाई गायकवाड, चंद्रकला पाटील, कल्पना देवरे, संदीप जाधव, धडकू पाटील, अमोल जीरेकर, डॉ.शराफत अली, प्यारेलाल पिंजारी, आसिफ शाह, अफसर शाह इंजिनियर, रियाज शाह व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.





# संविधान परीक्षेसाठी ॲसेंडस्कूलचे २५ परीक्षार्थी

## विद्यार्थी, शाळेच्या प्रमुखांसह शिक्षकवृंद सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ॲसेंड इंटरनॅशनल स्कूल निरा-पिंपरे (ता.पुरंदर) येथील विद्यार्थ्यांनीच नव्हे तर शाळेच्या प्रमुखांसह शिक्षकवृंद यांनी सुद्धा संविधान गुण गौरव परीक्षेत सहभाग नोंदविला आहे.रक्षित सामाजिक संस्था म्हसळे अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या संविधान गुणगौरव समितीच्या वतीने राज्यस्तरीय संविधान गुणगौरव परीक्षा २०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे.या परीक्षेसाठी निरा-पिंपरे येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलच्या २५ परीक्षार्थींनी सहभाग घेतला आहे. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे,सचिव निता खोमणे तसेच नितीन दगडे,मंजुश्री काटकर,दीपिका निगडे, रुपाली शितोळे, माधुरी ठोंबरे आदी ५ शिक्षक वृंद यांनी नोंदणी केली. तसेच कबीर सोलंकी, श्रेया धुमाळ, दुर्वा ननावरे, स्वप्नाली क्षीरसागर,स्वरांत पिसाळ, आर्या साळुंखे, दिप्ती आगाम, ईश्वरी फरांदे, सार्थक धायगुडे, अभय भोसले,अनुज दुर्गाडे, श्रेयश गुरमुडे, अथर्व साबळे, प्रांजल जाधव, उत्कर्षा पवार, एहसाब शहा, तन्मय गरदडे, समिधा निगडे आदी १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

ही परीक्षा शाळेत घेण्यासाठी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे, सचिव निता खोमणे व शाळेच्या प्राचार्या सुषमा भुंजे यांचे विशेष सहकार्य मिळालेले आहे. तसेच शाळेतील अपर्णा फरांदे आणि रुपाली शिंदे यांनी परीक्षार्थी यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मदत केली. परीक्षार्थींना लेखक नूरखाँ पठाण लिखित आपले संविधान... राज्यपध्दती नव्हे तर जीवनपद्धती हे पुस्तक देण्यात आलेले असून याच पुस्तकाच्या आधारे ही परीक्षा घेण्यात येणार आहे. "आमचे ध्येय संविधान जनजगृतीसाठी-भावी पिढीच्या उत्कर्षासाठी" हा संकल्प शाळेत राबविण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संविधान गुण गौरव समितीचे अध्यक्ष विलास पवार,उपाध्यक्ष शबनम पठाण, मार्गदर्शक नुरखाँ पठाण, सदस्य अझहर शहा, नितीन घोपे, दिपरत्न निलंगेकर,युवराज खोब्रागडे, किशोर चव्हाण,सुशिल गायकवाड आदीनी शाळेचे व सर्व परीक्षार्थी यांचे आभार मानलेले आहेत.

# हिमालयाच्या उंचीचे ध्येय ठेवा : गिरासे

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** विद्यार्थ्यांनी हिमालयाच्या उंचीचे ध्येय ठेवून ते साध्य करण्यासाठी अचाट मेहनत , जिद्द , अभ्यासाचे अचूक नियोजन केल्यास स्पर्धा परीक्षेत उज्ज्वल प्राप्त हमखास प्राप्त होते असे प्रतिपादन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक विकास गिरासे यांनी केले.

पहूर येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर मंगल कार्यालयात आज रविवारी राहुल रॉय मुळे संतोष चिंचोले यांनी मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन केले होते.

अदिती अर्बन बँकेच्या सहकार्याने आयोजित मेळाव्याचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष सुरेश देवकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार शांताराम लाठे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.प्रारंभी राजमाता जिजाऊ अहिल्यादेवी होळकर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या ज्ञानेश्वरी भामेरे आणि कोमल तडवी यांनी प्रेरणा गीत सादर केले. पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे, खनिज अधिकारी सचिन पाटील, एस. एस. गावंडे आदि मान्यवरांनी लोकसेवा, राज्यसेवा, पोलीस भरतीसह व स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी भास्कर पाटील, संतोष पाटील, मुख्याध्यापक एस. व्ही. पाटील, आर. टी. देशमुख , विनोद गोंधनखेडे, सोपान गाढवे, फिरोज तडवी, दशरथ पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी अजय देशमुख, वैभव पाटील, वैभव गाढे, रवींद्र लावणे, हर्षल पाटील, पंढरी बनकर यांच्यासह विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. सुत्रसंचालन शंकर भामेरे यांनी केले. आर. बी. पाटील यांनी आभार मानले. पहूर परिसरातील शेरी, लोंढरी, वाकोद, पाळधी, सांगवी खर्चाणे व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने मार्गदर्शनाचा लाभ घेतला.





# ग्रामपंचायत वेरुळ अंतर्गत स्वच्छता पंधरवडा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दि. ०१ अक्टोबर २०२३ रोजी एक तास श्रमदान करुन गावातील स्वच्छता करावयाची होती. या निमित्ताने गावातील दर्गा परीसर, जिल्हा परिषद केंद्रीय शाळा परीसर,तिर्थ कुंड परीसर, येथे श्रमदान करुन परीसरात असलेला कचरा याची साफ सफाई करण्यात आली.

अभियानात सहाय्यक गट विकास अधिकारी गोरखनाथ पवार, विस्तार अधिकारी पं हरकचंद कहाटे, ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घरमोडे, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र दांडेकर, स्वच्छता समन्वयक सुनिता मकरंद, सरपंच कुसुम प्रकाश पाटील, पोलिस पाटील रमेश ढिवरे, माजी सरपंच प्रकाश पाटील, चेअरमन मुलचंद चव्हाण, माजी सरपंच साहेबसिंग गुमलाडु,माजी सरपंच साहेबराव पांडव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश लोखंडे, हंसराज चव्हाण, राजेश आडे, मो नईमोद्दीन, गोरख लोनके, अविनाश आव्हाड, सूर्यभान भालेराव यांच्यासह गावातील प्रतीष्ठीत नागरीकांनी सहभाग नोंदविला.

# परतुरात विविध मागण्यांसाठी मोर्चासह ठिय्या आंदोलन

## एकच पर्व ओबीसी सर्व जय घोषणेने परतूर शहरात ओबीसींचे जोरदार शक्तिप्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरात बुधवारी ओबीसीच्या विविध मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन तहसील कार्यालया समोर करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ओबीसींचा जनसमुदाय उपस्थित होता.यावेळी प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. दरम्यान, शहरात रेल्वे स्थानकापासून ते तहसील कार्यालया पर्यंत भव्य असा मोटारसायकल मोर्चा काढण्यात आला यावेळी जवळपास दहा हजार दुचाकी सह अनेक पादचारी सहभागी झाले होते. यानंतर तहसील कार्यालया समोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देऊ नये तसेच ओबीसी शिष्यवृत्ती मध्ये वाढ करणे व ओबीसीची जात निहाय जनगणना करावी अशी मागणी सर्वच समाज बांधव यांनी केली. या ठिकाणी विचार मांडताना अनेकांचा एकच सूर होता की मराठा समाजाला आरक्षण द्या पण ओबीसी कोट्यातून नको असे सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ओबीसी समाजात अनेक भटक्या विमुक्त जाती आहेत त्या आणखी आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या सक्षम नाहीत यासाठी शासनाने उपाय योजना करणे गरजेचे आहे, अशा प्रतिक्रिया आल्या. सकाळी रॅलीची सुरवात मोंढा येथील रेल्वे स्टेशन परिसरातून झाली. तहसील कार्यालयात अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने हा मोर्चा पोहचला. जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर सर्व वाहनांसाठी वाहन स्थळ ठेवले होते. यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सकल ओबीसी बांधवांच्या या आहेत प्रमुख मागण्या
1)मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. 2)ओबीसी प्रवर्गासाठी असलेली नॉन क्रिमीलेअर अट रद्द करण्यात यावी.
3) बिहारच्या धर्तीवर सर्व जातीची जात निहाय जनगणना त्वरित करण्यात यावी. 4)आतापर्यंत मराठवाड्यात दिलेल्या खोट्या कुणबी प्रमाणपत्राची चौकशी करून दोषीवर कडक कारवाई करण्यात यावी. 5)महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हास्तरावर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीग्रह उभारण्यात यावे. 6) ओबीसी विकास महामंडळाला प्रति वर्ष



दहा हजार कोटी रुपये देण्यात यावे.
7) ज्या व्यवसायिक अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती बंद केली आहे ती पूर्वत चालू करावी.
8) सर्व आस्थापनातील मूळ निवडीच्या प्रवर्गाचे आदेश तपासून बिंदू नामावली तयार करण्यात यावी खोटी बिंदू नामावली तयार करणाऱ्या अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.
9) राज्याच्या अर्थसंकल्पातील निधी मंडळ आयोगाच्या शिफारसी प्रमाणे ओबीसी भटके, विमुक्त प्रवर्गावर खर्च करण्यात यावा. 10) तांडा वस्ती सुधार योजनेतील जिल्ह्याला शंभर कोटी रुपयांची तरतूद करावी. 11) महा ज्योती विद्यार्थी संख्या वाढवून त्यांचा सारथी व बार्टी प्रमाणे आर्थिक सवलती देण्यात याव्यात. 12) सर्व आस्थापनाच्या ओबीसी VJNT प्रवर्गाच्या अनुशेषाच्या सर्व जागा भरण्यात याव्यात. ना.छगनराव भुजबळ यांच्या बद्दल मनोज जरांगे यांनी एकेरी भाषेत उल्लेख केल्याबद्दल ओबीसी समाजाच्यावतीने घोषणाबाजी करत तीव्र विरोध दर्शविला. आ. पडळकर यांच्या नावाचा जयजयकार करत पूर्ण परिसर दणाणला होता.
स्व. गोपीनाथ मुंडेची आठवन निघतच अनेक जन भावुक झाल्याचे चित्र देखील या ठिकाणी दिसून आले. बंजारा समाजाच्या युवकांनी पारंपरिक वेशभूषा करत सर्व मोर्चाचे लक्ष्य वेधून घेतले होते संत सेवालाल महाराज यांचा जयघोष करत मोठया प्रमाणात बंजारा समाज सहभागी होता.
तसेच धनगर समाज बांधवांनी ओबीसीच्या नावाने चांगभलं अशा जोरात घोषणाच्या नावाने सर्व परिसर दणाणून सोडला होता. आष्टी ,परतूर, वाटुर येथील न्हावी,परिट समाजाने आपली दुकाने बंद करून मोर्चात सहभाग नोंदवला होता. लिंगायत समाजाचे आराध्य दैवत महात्मा बसवेश्वर चौकात पूजन करत रॅलीला सुरवात.

# काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील श्री.विलासदादा गायकवाड (माजी.तालुकाध्यक्ष आय काँग्रेस तथा चेअरमन वि.वि.का सोसायटी, दरेगाव पाडळी), साहेबराव साळुंके (मा.सरपंच तथा चेअरमन वि.वि.का सोसायटी सोबलगाव), सोमिनाथ गायकवाड ( मा.सरपंच, पाडळी तथा वि का सो. संचालक दरेगाव पाडळी), संतोष माधवराव साळुंके (वि का सोसायटी पॅनल प्रमुख, सोबलगाव), आजिनाथ कारभारी पवार (शालेय समिती अध्यक्ष तथा वि का सोसायटी, सोबलगाव) सागर रत्नाकर कुलकर्णी (मा.वि.का स सोसायटी संचालक, सोबलगाव) यांनी आज मुबंई येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनीलजी तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मा.शिवाजीराव गर्जे, जिल्हाध्यक्ष मा.आ. कैलासजी पाटील, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, आदिनाथ साळुंके आदींसह कार्यकर्ते उपस्थिती होते.



# कथांमधून उलगडतात मानवी जीवनाचे पदर

## प्रा. मिलिंद जोशी यांचे मत; उर्मिला घाणेकर लिखित 'निमिष' कथासंग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** "उत्तम निरीक्षण, विपुल शब्दसंग्रह व अनुभवविश्व समृद्ध असेल, तर वाचनीय साहित्याची निर्मिती होते. अनुभवांतून उतरलेल्या कथांमधून मानवी जीवनाचे पदर उलगडतात. लघुकथासंग्रह अल्पाक्षरी असला, तरी अर्थबहुल असल्याने यातील कथा, मानवी जीवनाचे दर्शन घडवितात," असे मत लेखक व वक्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.
लेखिका उर्मिला घाणेकर लिखित कॉन्टिनेन्टल प्रकाशन प्रकाशित 'निमिष' या लघुकथासंग्रहाचे प्रकाशन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पटवर्धन सभागृहात झालेल्या प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून लेखिका व पर्यावरण संरक्षक चित्कला कुलकर्णी, उर्मिला घाणेकर, संयोजक अमेय घाणेकर आदी उपस्थित होते. प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, "कथासंग्रह लिहिताना कला व कथा द्रव्य असावे लागते. माणसांची विण जपण्याचा स्वभाव असलेल्या उर्मिला घाणेकर यांच्या 'निमिष' कथासंग्रहात त्यांना जगताना आलेले अनुभव चितारले आहेत. नात्यांमध्ये होणारे पेच, गुंतागुंत आणि त्यातून मार्ग कसा काढायचा याचा बोध या कथांतून मिळतो. हरवलेले संवाद, दुभंगलेली नाती, तुटलेली मने या संग्रहात दिसतात. लेखक स्वतःच्या नजरेने समाजाकडे व समाजाच्या नजरेने स्वतःकडे



पाहत असतो. त्यातून निर्माण झालेले साहित्य वाचकाला भुरळ घालते. तंत्रज्ञानाचा उपयोग साहित्य प्रसारासाठी करावा. मात्र, त्याच्या आहारी जाता कामा नये. स्वातंत्र्य अणि स्वैराचार यात गल्लत न करता स्वच्छंदी आयुष्य जगायला हवे. 'निमिष' हा माझा दुसरा लघुकथासंग्रह आहे. यापूर्वीच्या 'तलग' लघुकथासंग्रहाला प्रतिसाद मिळाल्याने माझ्या मनात राहिलेल्या अनेक गोष्टी 'निमिष'मधून मांडल्या आहेत. 'चमत्कार', 'अनुश्री', 'गैरसमज', 'पाणी पुण्याचे', 'काकासाहेब' अशा वाचनीय लघुकथा या पुस्तकात आहेत. पतीच्या नोकरीनिमित्त विविध ठिकाणी राहताना अनेक माणसे भेटली. अनुभव आले. त्यातून सुचलेल्या या कथा आहेत, अशा शब्दांत उर्मिला घाणेकर यांनी मनोगत व्यक्त केले.
चित्कला कुलकर्णी म्हणाल्या, "निसर्ग अभ्यासण्यासाठी स्वेच्छानिवृत्ती घेऊन काम करत आहे. बीज बँक करण्यासाठी आम्ही काम करत आहोत. सहज व सोप्या भाषेत गोष्ट सांगण्याची हातोटी उर्मिला घाणेकर यांच्या या पुस्तकात दिसते. पुराण वाङ्मयाकडे डोळसपणे पाहायला हवे. वाचन संस्कृती कमी झाली असली, तरी मुलांमध्ये लेखन, वाचनाची गोडी टिकून आहे. साहित्य अधिक व्यापक व लोकप्रिय होण्यासाठी सोशल मीडिया, ब्लॉग, वेबसाइट यांसारखी नवमाध्यमे हाताळायला पाहिजेत. माधवी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अमेय घाणेकर यांनी आभार मानले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर